नागपूर महानगरपालिकेची स्थगित सर्वसाधारण सभा **गुरुवार दिनांक १८/०२/२०२१ रोजी दुपारी ३.२०** वाजता महानगरपालिकेच्या श्रीमंत राजे रघुजीराव भोसले, नगरभवन, महाल येथे मागील विचाराधिन तथा नवीन विषयावर विचार करण्याकरिता **महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. कोरोना/ २०२०/प्र.क्र.७६/नवि(१४) दि. ०३-०७-२०२० तसेच सचिवालय विभाग, मनपा कार्यालयाचे दि. ०३-०७-२०२० सूचना/परिपत्रक अन्वये Video Conferencing व्दारे आयोजित केलेल्या सभेचे कार्यवृत्त.**

## उपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | **१९** | **ड** | **दयाशंकर चंद्रशेखर तिवारी** | **महापौर** |
| २. | **२३** | **ब** | **मनिषा आशिष धावडे** | **उपमहापौर** |
| ३. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| ४. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| ५. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| ६. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| ७. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| ८. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| ९. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| १०. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| ११. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| १२. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| १३. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| १४. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| १५. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| १६. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| १७. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| १८. | ५ | अ | रिक्त | |
| १९. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या |
| २०. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य |
| २१. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| २२. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| २३. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य |
| २४. | ७ | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| २५. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| २६. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| २७. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| २८. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या |
| २९. | ८ | ब | रिक्त | |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ३०. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| ३१. | ९ | ब | संजय श्यामराव बुरेवार | सदस्य |
| ३२. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| ३३. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| ३४. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या |
| ३५. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य |
| ३६. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| ३७. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| ३८. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| ३९. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| ४०. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| ४१. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य |
| ४२. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या |
| ४३. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| ४४. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| ४५. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या |
| ४६. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| ४७. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| ४८. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| ४९. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| ५०. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| ५१. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या |
| ५२. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| ५३. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| ५४. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| ५५. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| ५६. | १६ | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| ५७. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| ५८. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| ५९. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| ६०. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| ६१. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| ६२. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| ६३. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| ६४. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| ६५. | २० | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य |
| ६६. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ६७. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| ६८. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या |
| ६९. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| ७०. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| ७१. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| ७२. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| ७३. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| ७४. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| ७५. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| ७६. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य |
| ७७. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| ७८. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| ७९. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| ८०. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या |
| ८१. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| ८२. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| ८३. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| ८४. | २७ | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| ८५. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| ८६. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| ८७. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य |
| ८८. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| ८९. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| ९०. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| ९१. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या |
| ९२. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| ९३. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| ९४. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| ९५. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| ९६. | ३१ | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| ९७. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| ९८. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| ९९. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| १००. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या |
| १०१. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| १०२. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| १०३. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १०४. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| १०५. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| १०६. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| १०७. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| १०८. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| १०९. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य |
| ११०. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| १११. | ३५ | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| ११२. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| ११३. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| ११४. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| ११५. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य |
| ११६. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| ११७. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| ११८. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या |
| ११९. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्या |
| १२०. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| १२१. | ३८ | अ | उज्ज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| १२२. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| १२३. | ना.स. | | अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |
| १२४. | ना.स. | | पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |
| १२५. | ना.स. | | गांधी निशांत गिरीश | सदस्य |
| १२६. | ना.स. | | जिचकार किशोर दामोदर | सदस्य |

**अनुपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| २. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| ३. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| ४. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| ५. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| ६. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्् |
| ७. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| ८. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य |
| ९. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| ११. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| १२. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| १३. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| १४. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| १५. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या |
| १६. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| १७. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| १८. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| १९. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| २०. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| २१. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| २२. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| २३. | २६ | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| २४. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या |
| २५. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| २६. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या |
| २७. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| २८. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| २९. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य |
| ३०. | ना.स. | | वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |

**<u>उपस्थित अधिकारी</u>**

**<u>श्री.राधाकृष्णन बी. निगम आयुक्त</u>**

**<u>डॉ.रंजना लाडे निगम सचिव</u>**

मा.महापौरजी यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली.

महापौर:- निगम सचिवांनी स्थगण प्रस्तावाचे वाचन करावे.

निगम सचिव:- मा.महापौरजी, दोन स्थगण प्रस्ताव प्राप्त झालेले आहे. श्री. प्रवीण दटके यांचा स्थगण प्रस्ताव आहे तो न घेता दुसरा स्थगण प्रस्ताव घेत आहे.

श्री. प्रवीण दटके:- मा.महापौरजी, मी माझा स्थगण प्रस्ताव मागे घेत आहे.

निगम सचिव:- (वाचले)

**<u>स्थगण प्रस्ताव</u>**

नागपूर शहरात असलेल्या अतिक्रमणाबाबत दिनांक १८/०२/२०२१ च्या सर्वसाधारण सभेत चर्चा करण्याकरिता स्थगण प्रस्ताव देण्यात येत आहे.

तानाजी वनवे
विरोधी पक्षनेता
महानगरपालिका,नागपूर

महापौर:- मा. सदस्यांनी स्थगण प्रस्तावावर चर्चा सुरु करावी. सन्माननीय सदस्य तानाजी वनवे यांनी चर्चा सुरु करावी. लिंकचा काही प्राब्लेम होत आहे काय? आपल्या फोनवरुन लिंक होत नसेल तर दुस-याच्या फोनवरुन लिंक करावे.

श्री.तानाजी वनवे:-मा.महापौरजी, या स्थगणप्रस्तावाद्वारे जे नागपूर शहरामध्ये जे अतिक्रमण झाले आहे आणि या संदर्भामध्ये जी अतिक्रमणाची कार्यवाही होत आहे ते अतिक्रमण काढण्याच्या संदर्भात मागच्या सभागृहामध्ये सुध्दा चर्चा करण्यात आली होती. जुनी शुक्रवारीच्या बाजुला कार वॉशिंग सेंटर आहे या ठिकाणी अनेक वेळा सभागृहात हा विषय आला आहे आणि हा विषय आल्यानंतर सुध्दा त्याठिकाणी अतिक्रमण काढण्यात आले नाही या संबंधी प्रशासनाने उत्तर दयावे.

महापौर:- मा.सदस्य स्थगण प्रस्ताव हा सहजासहजी प्रश्नोत्तराचा काळ नसतो त्यामुळे आपण आपले पुर्ण म्हणणे एकदा मांडून दया त्यानंतर प्रशासनाचे म्हणणे ऐकुन घेवू.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, अतिक्रमणाच्या संबंधात नागपूर शहरामध्ये संपुर्ण रस्त्याच्या फुटपाथवर अतिक्रमण मोठया प्रमाणात आहे. मग मोमीनपुरा असो, सेंट्रल ऐव्हेन्युचा भाग असो, नंदनवनचा भाग असो, मानेवाडयाचा भाग असो, मग आमच्या जुन्या शुक्रवारीचा भाग असो, उमरेड रोड असो त्या ठिकाणी अतिक्रमण काढण्याच्या संबंधामध्ये त्वरित कार्यवाही करण्याबाबत मा.आयुक्तांना विनंती केली. मागच्या सभागृहामध्ये सुध्दा मी त्या ठिकाणचे अतिक्रमण काढण्याच्या संदर्भात विचारणा केली असता २ दिवसात अतिक्रमण काढण्यात येईल असे प्रशासनाने उत्तर दिले होते. त्या ठिकाणी नर्सरी कायम आहे, कार वॉशिंग सेंट्रर कायम आहे. या संबंधात प्रवीण दटके सुध्दा बोलले होते. शहरात प्रत्येक ठिकाणी मोठया प्रमाणात अतिक्रमण आहे. दुकाने लावणारे लोक आहेत त्यांच्याकडून एनडीएसचे लोक पैसे घेतात अशी मला मिळालेली माहिती आहे. एनडीएसला जे लोक पैसे देतात त्यांचे दुकाने राहतात आणि जे लोक पैसे देत नाही त्यांच्या दुकानावर फाईन बसते. जे लोक हॉकर झोन मध्ये आहेत त्यांना विनाकारण त्रास दिला जातो मात्र जी मुख्य रस्त्यावर, फुटपाथवर अतिक्रमण करुन बसलेली मंडळी आहेत. त्या ठिकाणचे अतिक्रमण ताबडतोब काढले पाहिजे. नागपूर शहरामध्ये फुटपाथवरुन चालण्याकरिता लोकांना जागा नाही. दुकानदारांनी त्याठिकाणी अतिक्रमण करुन ठेवलेले आहे. अनेक मा.सदस्यांनी सभागृहामध्ये या विषयावर चर्चा केलेली आहे आणि अनेक वेळा मा.महापौरजी यांनी रुलिंग दिलेले आहे. महापौरांनी रुलिंग दिल्यानंतर सुध्दा ते अतिक्रमण निघत नाही याचा अर्थ आपण काय समजावा. बिनधास्तपणे त्या ठिकाणी कार वाशिंग सेंटर सुरु आहे. लोकांच्या कार रस्त्यावर उभ्या आहेत. कारांची त्या ठिकाणी विक्री सुरु आहे. लोकांच्या अतिक्रमणासाठी फुटपाथ आहे काय? हा फार गंभीर प्रश्न आहे. शहरात ज्या ज्या ठिकाणी अतिक्रमण आहे ते मग मोमीनपु-याची दुकानाची लाईन असो, मा.नगरसेवकांनी पत्र दिलेले आहे त्या ठिकाणी ताबडतोब अतिक्रमण हटविण्यात यावे. ज्या ठिकाणी अतिक्रमण हटविण्याच्या बाबतीतील कार्यवाही करायला पाहिजे त्याठिकाणी प्रशासन कोणत्याही प्रकारची कार्यवाही करीत नाही आणि ज्या ठिकाणी हटवायला नको त्या ठिकाणी कारण नसतांना साधी एक तक्रार आली तर पोलीस विभागाच्या मदतीने अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही केली जाते. ही गंभीर बाब आहे. अतिक्रमण सुरक्षिततेचे जर कुणी काम करीत असेल तर त्यांच्यावर गंभीर स्वरुपाची कार्यवाही करावी असे माझे स्थगण प्रस्तावाच्या माध्यमातून म्हणणे आहे.

महापौर:- विरोधी पक्ष नेते यांनी ज्या विषयवर लक्ष वेधले आहे तो नागनदीच्या काठावर अतिक्रमण झालेली बाब आहे त्यावर प्रशासनाने उत्तर दयावे.

निगम आयुक्त- संबंधित झोनचे असिस्टंट कमिश्नर यांनी या संदर्भात खुलासा करावा.

श्री.मोरोणे(उपायुक्त, अतिक्रमण):-मा.महापौरजी, आता अतिक्रमण दूर करण्याची कार्यवाही दहा झोनमध्ये सुरु केलेली आहे. इव्हन ॲपरवर आलेल्या तक्रारची दखल घेवून अतिक्रमण हटवीत आहे. मा.सदस्य विरोधी पक्ष नेता श्री.तानाजी वनवे यांनी सांगितले, नागनदीच्या काठावर वसलेले अतिक्रमण आहे. १० झोनला सर्व्हे करुन तेही अतिक्रमण काढण्याचे नियोजन करण्यासाठी सांगितले आहे. तेही अतिक्रमण काढण्यात येईल. तसेच पीएचई विभागातर्फे नदीची एलो लाईन, रेड लाईन मार्किंग होणार आहे आणि त्या फिल्डमध्ये येणारे जे अतिक्रमण आहे त्याचे नियोजन करुन ते सुध्दा काढण्यात येणार आहे.

महापौर:- सन्माननीय विरोधी पक्ष नेता यांचे स्पष्ट म्हणणे असे आहे. त्यांनी सुचित केल्यानंतरही ही कार्यवाही झालेली नाही. आपण दिलेल्या उत्तरात नमुद केले आहे की ॲपवर ज्या तक्रारी येतात त्यावर कार्यवाही करण्यात येते याचा अर्थ असा समजण्यात यावे काय? की ॲपवर आलेल्या तक्रारीवर कार्यवाही करण्यात येते आणि सन्माननीय नगरसेवकांनी दिलेल्या पत्रावर कार्यवाही करण्यात येत नाही.

श्री.मोरोणे(उपायुक्त, अतिक्रमण):-मा.महापौरजी, ॲपवर ज्या काही तक्रारी प्राप्त होतात. ज्या तक्रारी प्रत्येक झोनमध्ये प्राप्त होतात, मुख्यालयात सुध्दा ज्या तक्रारी प्राप्त होतात त्या सर्व तक्रारी त्या त्या झोनला पाठविण्यात येतात. ॲपद्वारे आलेल्या तक्रारी ची दखल घेण्यात येते त्याचप्रमाणे ऑनलाईन आलेल्या तक्रारींची सुध्दा दखल घेण्यात येते, मुख्यालयातून आलेल्या तक्रारीची सुध्दा दखल घेण्यात येते. याबाबत झोनला सुचना केल्या आहेत. गेल्या दहा दिवसापासून संपुर्ण शहरामध्ये अतिक्रमण काढण्याची मोहिम सुरु केली आहे. मा.सदस्यांनी जी नर्सरी आणि वॉशिंग सेंटरच्या अतिक्रमणाबाबत सांगितले ते सहा.आयुक्त हनुमानगर झोन यांनी मला उत्तरात सांगितल्याप्रमाणे ती जागा एनआयटीची आहे. एनआयटीच्या कार्यकारी अभियंता यांच्याशी मी सुध्दा बोललो आहे. एनआयटीचे मुख्य अभियंता यांनी १५ दिवसाची वेळ दिला होता. ती एनआयटीची जागा असल्यामुळे एनआयटी कार्यवाही करेल असे एनआयटीचे कार्यकारी अभियंता यांनी कार्यवाही करु असे सांगितले आहे.

महापौर:- नदी च्या काठावर १५ मीटरच्या वर कुठलेही बांधकाम असो, कुठलेही अतिक्रमण असो शासनाच्या निर्देशाप्रमाणे आणि कोर्टाच्या निर्देशाप्रमाणे त्याच्यावर आपण कार्यवाही करु शकतो. कोणत्याही मालकाची प्रापर्टी असो, हे नियम हयातीत असतांना फक्त एनआयटीची जागा आहे म्हणून हा विषय कां धरण्यात आला आहे याच्या मागे काय भुमिका आहे.

श्री.मोरोणे(उपायुक्त, अतिक्रमण):-मा.महापौरजी, ती जागा ज्या ठिकाणी नर्सरी आहे आणि ज्या ठिकाणी कार वॉशिंग सेंटर आहे ती जागा नागपूर सुधार प्रन्यासची आहे.

श्री.प्रवीण दटके:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, जर ती जागा एनआयटी असेल तर त्याचे बाजूला महानगरपालिकेचे कचरा कलेक्शन सेंटर आहे. जर ती एनआयटीची जागा आहे तर त्या ठिकाणी कुणी व्यक्ति कार वॉशिंग सेंटर, नर्सरी लावू शकतो तर तर मा.महापौरजी माझे म्हणणे आहे की त्या अतिक्रमणावर योग्य ती कार्यवाही करण्यास आपण मा.आयुक्तांना योग्य ते निर्देश दयावे या स्थगण प्रस्तावाच्या माध्यमातून अशी माझी विनंती आहे. आपण दहा झोनच्या माध्यमातून कार्यवाही सुरु करीत आहे. फुटपाथवरील अतिक्रमण दूर करण्यासाठी, रस्त्यावरील अतिक्रमण दूर करण्यासाठी ज्या प्रमाणे गोरगरीब लोकांना त्रास देतो तशीच कार्यवाही मोठमोठया ठिकाणचे अतिक्रमण दूर करण्यासाठी सुध्दा कार्यवाही करावी. महानगरपालिकेचे `पौर जन हिताय' हे ब्रीद वाक्य आहे. या ब्रीद वाक्याप्रमाणे या शहरात राहणा-या सर्व नागरिकांवर त्यामध्ये सरसकट नियमाप्रमाणे योग्य कार्यवाही व्हावी अशा प्रकारची भुमिका प्रशासनाची असली पाहिजे. तशीच भुमिका विरोधी पक्ष नेता यांची राहील आणि या सभागृहाची सुध्दा राहील. त्यामुळे प्रशासनाने याची दखल घेवून गरीबांवर, फुटपाथावर कार्यवाही करतांना प्रशासनाची अशी दुपटी भुमिका असू नये. या स्थगण प्रस्तावाच्या माध्यमातून होत असलेल्या चर्चेच्या अनुषंगाने याची दखल घेतली जावी.

महापौर:- सन्माननीय विरोधी पक्ष नेता यांनी जी सुचना केली. त्याच्यावर त्वरित कार्यवाही करण्यात यावी. ती कोणाच्याही मालकीची जागा असेल आपण पाठपुरावा करुन ताबडतोब कार्यवाही झाली पाहिजे याकडे लक्ष दयावे. कोणतेही अतिक्रमण जास्त दिवस टिकून राहिले तर त्याच्याबाबतीत जनमाणसामध्ये सिंम्पत्ती निर्माण होत असते आणि मग ते अतिक्रमण काढत असतांना प्रशासनाला अडचण येते म्हणून अतिक्रमण झाल्याबरोबर कार्यवाही केली तर ही अडचण येणार नाही आणि यातून सुटका करुन घेता येईल होईल. या सभागृहाच्या माध्यमातून अनेक सुचना देण्यात आल्या. अनेक सभागृहात अतिक्रमणाचे अनेक विषय मांडण्यात आले. एका सभागृहात हा जो रामझुल्यापासून ते मोमीनपुराकडे जाणारा जो मार्ग आहे त्या रस्त्यावर दोन्ही बाजूला जुन्या गाडया भंगार आहेत त्यांच्या रांगाच्या रांगा उभ्या आहे असे लक्षात येते. आणि वर्षानुवर्षापासून तेथे हा व्यवसाय सुरु आहे. कबाड झालेले वाहन उभे असतात. कबाडी पैसे घेवून कबाडीचा व्यवसाय करतो त्याच्या मागे असामाजिक तत्वे त्याचा गैररितीने त्याचा फायदा घेतात. त्याच्या सोबतच सेंट्रल ऐव्हेन्युचे जे दोन्ही पॅरलल रोड आहेत. तो रोड दुसरवार सिंगनल पासून लाल इमली पर्यंतचा असो किंवा तो रोड सरस्वती शाळेपासून डायरेक्ट आजमशहा चौक पर्यंतचा असो. या दोन्ही पॅरलल रोडवर अनेक वर्कशॉप सुरु आहेत त्यांनी दहा बाय दहा ची रुम घेतली आहे आणि समोर त्याच्यापेक्षा जास्त जागेवर अतिक्रमण करुन गाडी रिपेरिंगचे काम सुरु होते. त्या गाडयांचे पेटिंगचे पासून सर्व काम तेथे सुरु असतात. एवढेच नाही तर सदरमध्ये गड्डीगोदाम चौकापासून सदरकडे जाणारा जो रस्ता आहे. त्या रस्त्यावर सुध्दा अनेक वर्कशॉप उघडलेले आहेत. याबाबत अनेक तक्रारी महापौर कार्यालयात सुध्दा प्राप्त होत आहेत. ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारचे व्यवसाय करण्याचे प्रकरण आपल्या लक्षात येत आहे. त्या ठिकाणी महानगरपालिकेने कुणाची कंम्प्लेंट आली किंवा नाही, आपल्या झोनला याची माहिती आहे. त्याच्यावर ताबडतोब कार्यवाही करावी सोबतच हज हाऊसच्या बाजूला ८० लक्ष रुपये खर्च करुन रोड वायन्डिंग महानगरपालिकेने केली. १५ -१५ फुटावर शेड टाकून रस्त्यावर व्यवसाय करीत आहे. त्याच्यावर सुध्दा कार्यवाही करण्यात यावी. मा.सदस्य श्री.प्रविण दटके यांनी एक बाब लक्षात आणून दिली की महानगरपालिकेने कार्यवाही करीत असतांना महानगरपालिकेचा आम्ही विरोध करीत नाही त्याची प्रशंषाच करतो. आणि जनप्रतिनिधी म्हणून आम्ही सहकार्यच करतो. याच्या सोबतच फक्त गरीबांवरच कार्यवाही न करता जे मोठमोठया बाजारपेठा आहेत. त्याच्या समोर मोठमोठया दुकानदारांनी जे अतिक्रमण केले आहे. सोबतच त्याच्यावर कार्यवाही झाली तर ही कार्यवाही विशेष वर्गाला त्रास देण्यासाठी आहे हे जे स्टॅबलिश करण्याचा काम सुरुआहे याला आळा घालण्यासाठी प्रशासनाने पुढचे पाऊल उचलावे असे स्पष्ट म्हणणे आहे. सोबतच महानगरपालिका बाजाराच्या जागेवर कार्यवाही करीत आहे हे अभिनंदनीय आहे. याचे सुध्दा अभिनंदन करतो. अशी कार्यवाही प्रत्येक ठिकाणी जेथे असे प्रकरण सुरु आहे त्या ठिकाणी केली पाहिजे. मोमीनपुरा माझ्या प्रभागाला लागून आहे तेथील नगरसेवक वारंवारं या विषयाला घेवून माझ्या कार्यालयात संपर्क करतात त्यांनी दिलेले पत्र आपल्या प्रभागात पाठवितो परंतु तेथेही पुरेशी कार्यवाही होतांना दिसत नाही. महानगरपालिकेच्या नगरसेवकांनी अतिक्रमणाच्या बाबत दिलेली जी तक्रार आहे त्याच्यावर आणि तक्रार नसेल तरी सुध्दा महानगरपालिकेची जी यंत्रणा आहे ती दिवसेंदिवस काम करीत आहे. ते अतिक्रमण त्यांच्या लक्षात येत आहे त्याच्यावर कार्यवाही झाली पाहिजे तसे निर्देश या सभागृहाच्या माध्यमातून देण्यात येत आहे.

श्री.विजय झलके:- मा.महापौरजी, अतिक्रमणाच्या अनुषंगाने, उमरेडवर वर एक अतिक्रमणाच्या बाबतीत मा.आयुक्त महोदयांशी चर्चा केली होती, आयुक्त महोदयांना सांगितल होते. हायकोर्टाच्या निर्देशाप्रमाणे आपण अतिक्रमण काढून नाही राहिले. वारंवारं या संदर्भात मी पत्रव्यवहार करीत आहे. सगळयांना सांगून झाले तरी अतिक्रमण काढण्यात आले नाही. तसेच यशवंत स्टेडिअम समोरील भिका-यांच्या अतिक्रमणाच्या संदर्भात स्थानिक लोकांनी तक्रारी दिलेल्या आहेत. हाही अतिक्रमणाचा मोठा भाग आहे. त्या भागात मोठया प्रमाणात चो-या होत असतात. प्रशासन यावर कुठलीही कार्यवाही करीत नाही.

(बेल)

महापौर:- सन्माननीय सदस्य मी स्थगण प्रस्तावावर रुलिंग दिलेले आहे. आपण आपले म्हणणे यापूर्वी ठेवायला पाहिजे होते. आपण सन्माननीय पदाधिकारी आहात. नियमाप्रमाणे हे सभागृह चालले पाहिजे हे मी या ठिकाणी नमुद करतो. मी आपल्या रुलिंगमध्ये स्पष्ट नमुद केले आहे. नगरसेवकांच्या पत्राद्वारे आलेल्या सर्व तक्रारी प्राथमिकतेने दूर झाल्या पाहिजे आपण व्यैयक्तिक रित्या हा विषय मा.आयुक्तांशी बोललेले आहात. त्या ठिकाणी हंडरेड परसेंट कार्यवाही होईल. सभागृहाच्या निर्देशाचे पालन प्रशासन करेल अशी मला खात्री आहे. या शिवाय काही तक्रारी असतील बाकी नगरसेवकांच्या असतील त्यांनी लेखीमध्ये आयुक्त महोदयांकडे दयाव्या. आयुक्त त्यावर कार्यवाही करतील असा मला विश्वास आहे.

**ठराव क्र.४२:- नागपूर महानगरपालिका, महासभेचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.**

1. म.न.पा. सर्वसाधारण सभा दिनांक 20.10.2020 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
2. म.न.पा. विशेष सभा दिनांक 20.10.2020 दुपारी 12.00 वाजता चे कार्यवृत्त
3. म.न.पा. विशेष सभा दिनांक 20.10.2020 दुपारी 12.30 वाजता चे कार्यवृत्त
4. म.न.पा. स्थगित विशेष सभा दिनांक 22.10.2020 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त

**ठराव क्र. ४३:- नागपूर महानगरपालिका, विशेष समित्यांचे कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.**

१. वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती

१) सोमवार दि. २०-०४-२०२० दुपारी ०२-०० वाजता चे कार्यवृत्त
२) सोमवार दि. ०१-०६-२०२० दुपारी ०१-०० वाजता चे कार्यवृत्त
३) गुरुवार दि.१०-०९-२०२० दुपारी ०१-०० वाजता चे कार्यवृत्त
४) बुधवार दि. १६-१२-२०२० दुपारी ०१-०० वाजता चे कार्यवृत्त

२. विधी व सामान्य प्रशासन विशेष समिती

१) शुक्रवार दि. १६-१०-२०२० दुपारी ०३-३० वाजता चे कार्यवृत्त

३. शिक्षण विशेष समिती

१) सोमवार दि. १६-०३-२०२० दुपारी ०१-०० वाजता चे कार्यवृत्त
२) सोमवार दि. १७-०६-२०२० दुपारी ०१-०० वाजता चे कार्यवृत्त
३) मंगळवार दि. २७-१०-२०२० दुपारी ०१-०० वाजता चे कार्यवृत्त

४. क्रीडा विशेष समिती

१) शुक्रवार दि. १२-०६-२०२० दुपारी ०३-०० वाजता चे कार्यवृत्त
२) गुरुवार दि. १३-०८-२०२० दुपारी ०३-०० वाजता चे कार्यवृत्त

५. कर आकारणी व कर संकलन विशेष समिती

१) बुधवार दि. १७-०६-२०२० दुपारी ०३-०० वाजता चे कार्यवृत्त

६. जलप्रदाय विशेष समिती

१) मंगळवार दि. १३-१०-२०२० दुपारी ०४-०० वाजता चे कार्यवृत्त

७. अग्निशमन व विद्युत विशेष समिती

१) शुक्रवार दि. ०५-०६-२०२० दुपारी ०३-०० वाजता चे कार्यवृत्त

८. दुर्बल घटक समिती

१) सोमवार दि. १४-१२-२०२० दुपारी १२-०० वाजता चे कार्यवृत्त

**<u>ठराव क्र.४४</u>:- नागपूर महानगरपालिका, स्थायी समितीचे खालील तिमाही अहवाल कायम करण्याच्या प्रश्नाची सभागृहाने नोंद घेतली.**

१. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक २०-०७-२०२० रोजी दुपारी १२-०० वाजता

२. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०३-०८-२०२० रोजी दुपारी १२-०० वाजत

३. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०१-०९-२०२० रोजी दुपारी १२-०० वाजता

४. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०८-०९-२०२० रोजी दुपारी १२-०० वाजता

५. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक २३-०९-२०२० रोजी दुपारी १२-०० वाजता

६. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०९-१०-२०२० रोजी दुपारी १२-०० वाजता

७. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १०-१२-२०२० रोजी दुपारी १२-०० वाजता

८. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक २९-१२-२०२० रोजी दुपारी १२-०० वाजता

**<u>ठराव क्र.४५/ वि.क्र.८२</u> :-** **विकास योजना – नागपूर.**

**{नगररचना विभाग }** चंदनबाई टेम्पल प्रिसींट या अभिन्यास नकाशातील मौजा – नागपूर, खसरा क्र. ४९० मधील भुखंड क्र. ४३५ ते ४४३ असे एकुण ९ भुखंडकाचा मंजुर विकास योजनेत "सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च)" ऐवजी "निवासी" उपयोग दर्शविण्याबाबत विकास योजनेत आवश्यक बदल दर्शविणेबाबत.

**संदर्भ** –१) अधिक्षक अभियंता, नागपूर सुधार प्रन्यास , नागपूर यांचे या कार्यालयास असलेले पत्र क्र. अधि.अभि./रचना/९२८, दि ०७.०६.२००८

२) या कार्यालयाचे प्रस्तावाखालील भुखंडधारक यांचे प्रतिनिधी व सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, नागपूर सुधार प्रन्यास, यांना पृष्ठांकित केलेले पत्र क्र. मनपाना/नरवि/१९२६, दि २५.०१.२०१९.

३) उपसंचालक, नगर रचना, नागपूर सुधार प्रन्यास , नागपूर यांचे प्रस्तावाखालील भुखंडधारक यांचे प्रतिनिधी यांना असलेले तसेच या कार्यालयास पृष्ठांकित असलेले पत्र क्र.उसंनर/रचना/८२१, दि २८.०१.२०१९ (या कार्यालयास प्राप्त दि. ३१.०१.२०१९)

४) प्रस्तावाखालील भुखंडधारकांचे प्रतिनिधी यांचे या कार्यालयास असलेले पत्र दि ०२.०३.२०१९

५) उपसंचालक, नगर रचना, नागपूर सुधार प्रन्यास , नागपूर यांचे सचिव – २, संपत्ती, नागपूर सुधार प्रन्यास यांना उद्रदेशून असलेले तसेच या कार्यालयास पृष्ठांकित असलेले पत्र क्र. उसंनर/रचना/२६१३, दि २६.०३.२०१९.

विषयांकित प्रकरणी संदर्भीय पत्र क्र. १ व ३ अन्वये अधिक्षक अभियंता व उपसंचालक, नगर रचना, नागपूर सुधार प्रन्यास , नागपूर यांनी मौजा – नागपूर, खसरा क्र. ४९०, नागरोड व उमरेड रोड यांच्या जक्शनवर दक्षिणेकडे नागपूर सुधार प्रन्यासचा चंदनबाई टेम्पल प्रिसींट हा अभिन्यास आहे व तो पुर्णपणे विकसीत देखील झालेला आहे. ही जागा नागपूर सुधार प्रन्यासच्या इंडस्ट्रीयल बस्ती इम्पुव्हमेंट स्कीम अंतर्गत समाविष्ट असून शासनाच्या दि. २७.०२.२००२ च्या अधिसूचनेनूसार उक्त जागेकरीता नियोजन "नागपूर महानगरपालिका" आहे.

- उपरोक्त अभिन्यासाच्या जागेत उत्तरेकडे बहुतांश जागेवर विद्यमान चर्च असून ही वास्तु पुरातन आहे व

चर्चच्या दक्षिणेकडे नागपूर सुधार प्रन्यासने सन १९५३ ते १९९५ दरम्यान भुखंड क्र. ४३५ ते ४४३ अशी एकुण ९ भुखंडके "निवासी" उपयोगाकरीता वाटप केले आहेत.

- तथापी, १९७६ च्या मुळ मंजुर विकास योजनेत उक्त भुखंड क्र. ४३५ ते ४४३ अशी एकुण ९ भुखंडाची जागा ही "चर्च" प्रांगणात दर्शविण्यात आली व तदनंतर दि ०७.०१.२००० च्या सुधारीत मंजुर विकास योजनेत देखील अनावधाने चर्च प्रांगणाची हद्द ही १९७६ च्या विकास आराखडयानूसार कायम दर्शविण्यात आली असल्यामुळे दि. ०७.०१.२००० च्या प्रचलित विकास योजनेत ही संपुर्ण जागा विद्यमान चर्चकरीता लाल रंगाने (Public –Semipublic) सार्वजनिक – निमसार्वजनिक विभागात दर्शविण्यात आलेली आहे.

- सदर भुखंडे नागपूर सुधार प्रन्यासने लिजवर सन १९५३ ते १९६७ या कालावधी दरम्यान निवासी वापराकरीता वाटप करण्यात आले असून, सध्यास्थितीत उक्त भुखंड क्र. ४३५ ते ४४३ चे उपयोगनिहाय तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | भुखंड क्र. | नागपूर सुधार प्रन्यासच्या वाटपाची तारीख व वाटपाप्रमाणे उपयोग | DP 76 प्रमाणे उपयोग | DP 2001 प्रमाणे उपयोग | जागेवरील सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४३५ | दि. २८.०३.१९६७ निवासी | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | निवासी |
| २ | ४३६ | दि. १७.१२.१९५३ निवासी | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | निवासी |
| ३ | ४३७ | दि. २९.१२.१९५४ निवासी | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | निवासी |
| ४ | ४३८ | दि. ०७.११.१९५४ निवासी | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | निवासी |
| ५ | ४३९ | दि. ०६.०१.१९५४ निवासी | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | निवासी |
| ६ | ४४० | दि. ०६.०१.१९५४ निवासी | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | निवासी |
| ७ | ४४१ | दि. २३.१२.१९५३ निवासी | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | निवासी |
| ८ | ४४२ | दि. २७.१२.१९५४ निवासी | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | निवासी |
| ९ | ४४३ | दि. ०३.०३.१९६५ निवासी | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | निवासी |

- आता उक्त भुखंड क्र. ४३५ ते ४४३ असे ९ "निवासी" भुखंडाचे पटटापंजीयनाचा पुर्वकालावधी (३० वर्ष) संपुष्ठात आल्यानंतर उक्त भुखंडाचे नुतनीकरण करतांना भुखंड उपयोग सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) असल्यामुळे नागपूर सुधार प्रन्यास ला अडथळे निर्माण होतात.
- शासनाच्या दि. २७.०२.२००२ च्या अधिसूचनेनूसार उक्त भुखंडकाचा मंजुर विकास योजनेत सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) ऐवजी "निवासी" उपयोग बदल करणेकरीता नागपूर सुधार प्रन्यासने कळविले आहे.

उपरोक्तनुसार प्रस्तावाखालील भुखंडाचे मालकीहक्काचे दस्तावेजांचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्लॉट नं . | मालकी हक्काचे दस्तावेजाचे विवरण |
|---|---|---|
| १ | ४३६ | १) NIT लिजडिड, २) पॉवर ऑफ अॅटर्नी |

| | | |
|---|---|---|
| २ | ४३७ | १) NIT ग्राउंड रेन्ट, २) रजिस्ट्री , ३) NMC Tax |
| ३ | ४३८ | १) NIT लिजडिड, २) ग्राउंड रेन्ट NIT , ३) आखिवपत्रिका |
| ४ | ४३९ | १) NIT लिजडिड, २) सनद, ३) आखिवपत्रिका, ४) NMC Tax |
| ५ | ४४० | १) NIT लिजडिड, २) सनद, |
| ६ | ४४१ | १) NIT ग्राउंड रेन्ट, २) NIT लिजडिड, ३) NMC Tax |
| ७ | ४४२ | १) NIT लिजडिड, १) NIT ग्राउंड रेन्ट , ३) NMC Tax , ४) मॅप |
| ८ | ४४३ | १) NIT लिजडिड, २) NMC Tax , |

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये शासन, अधिसूचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६-२६४३-प्र. क्र.३००(अ) -९७-नवी-९, दि ०१ मार्च २००० पासून अमंलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४००-१६२८-सी.आर.-२००-नवि-९, दि १०.०९.२००१ अन्वये मंजुर झाली असून ती दि. २१.०९.२००१ पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्र. टिपीएस-२४०१-८८५-प्र. क्र.-७६/नवि-९ दि २७.०२.२००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तथापी शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४१९-१४१९-प्र.क्र.-१५४/२०१९-नवि-९, दि २७.०८.२०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या सात योजनेकरीता सुध्दा नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेतील चंदनबाई टेम्पल प्रिसींट या अभिन्यास नकाशातील मौजा – नागपूर, खसरा क्र. ४९० मधील भुखंड क्र. ४३५ ते ४४३ असे एकुण ९ भुखंडकाचा मंजुर विकास योजनेत " सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) " ऐवजी "निवासी" जमिन वापर क्षेत्रात अंतर्भुत करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करण्याचे नागपूर सुधार प्रन्यासकडून प्रस्तावित असून उक्त भागाकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे. उक्त जागेचे मुळधारक नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर असून विषयांकित जागेवरील भुखंड क्र. ४३५ ते ४४३ असे ९ भुखंडाकरीता नागपूर सुधार प्रन्यास या कार्यालयाने भुखंडधारकास यापुर्वी भाडेपटटा दिलेला आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता, उक्त भुखंडे चर्चकरीता दर्शविलेल्या सार्वजनिक – निमसार्वजनिक विभागात समाविष्ट असल्याने त्यामध्ये फेरबदल करणे आवश्यक आहे. मौजा – नागपूर, खसरा क्र. ४९० मधील भुखंड क्र. ४३५ ते ४४३ असे एकुण ९ भुखंडकाचा मंजुर विकास योजनेत **"सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च)" ऐवजी "निवासी"** जमिन वापर क्षेत्रात अंतर्भुत करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये मंजुर विकास योजनेत फेरबदल करणेकरीता महानगरपालिका सभागृहाची मान्यता प्राप्त झाल्यास सदर फेरबदलाची अधिसूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन, त्यावरील नागरीकामार्फत प्राप्त आक्षेप/हरकतींवर योग्य निर्णय घेवून प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्यासाठी मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबत मंजुरी देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.४६/ वि.क्र.१६ :-** महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधिन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम –२००१ मधील तरतुदीनूसार पुढील सहा महिण्याकरीता मुदतवाढ देणे, प्रकरणाच्या तपासणी शुल्कात वाढ करणेबाबत. **{नगर रचना विभाग}**

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम

१९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासननिर्णय क्र. टिपीएस—२४९६—२६४३—प्र.क्र. ३००(अ)—९७—नवि—९, दि.०७.०१.२००० अन्वये भागशः मंजुर झालेली असून दि.०१.०३.२००० पासून अंमलात आलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस—२४००—१६२८—प्र.क्र.२००—नवि—९, दि. १०.०९.२००१ अन्वये मंजुर झालेली असून दि. २१.०९.२००१ पासून अंमलात आलेली आहे.तसेच शासन निर्णय क्र. टिपीएस—२४०१—८५५—प्र.क्र. ७६—नवि—९, दि. २७.०२.२००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यास क्षेत्रांतर्गत ७ योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तसेच नागपूर शहराच्या संपुर्ण क्षेत्रामध्ये गुंठेवारी विकासाचे नियंत्रण व नियमितीकरण नागपूर सुधार प्रन्यासकडून करणेबाबत शासनाने निर्देश क्र. गुंठेवा—१००२/१५४०/प्र.क्र.३५६/२०००/नवि—३०, दि. ०६.१२.२००२ अन्वये कळविलेले होते. तसेच गुंठेवारी अधिनियमाअंतर्गत नियमाधिन केलेल्या भुखंडावर बांधकाम परवानगी देणे व विकास आकार वसुल करून त्या भागातील विकास कामे करण्याचे अधिकार शासनाने दि. १०.०१.२००३ रोजीच्या पत्रान्वये नागपूर सुधार प्रन्यासला दिलेले होते.

आता शासन निर्णय क्र. टिपीएस—२४१९—१४१९—प्र.क्र. १५४—२०१९—नवि—९, दि. २७.०८.२०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यास क्षेत्रांअंतर्गत ७ योजनांचे क्षेत्राकरीता नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. त्यानूसार नागपूर शहराच्या संपुर्ण हद्दीतील गुंठेवारी अधिनियमाअंतर्गत मंजुर अभिन्यासातील भूखंडे नियमित करणे व नियमाधिन केलेल्या भूखंडावर बांधकाम परवानगी देणेची कार्यवाही नागपूर सुधार प्रन्यासकडून प्राप्त प्रकरणी नागपूर महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधिन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम —२००१, दि. ३०.०४.२००१ पासून अंमलात आला असून उक्त अधिनियमाच्या कलम —३ अन्वये नियमितीकरणास पात्र असणाऱ्या भुखंडधारकाने उक्त अधिनियमाच्या कलम —४ अन्वये भूखंड नियमितीकरणास नियोजन प्राधिकरणाकडे त्याबाबतीत अर्ज करणे आवश्यक आहे. उक्त अधिनियमाच्या कलम —४(१) नूसार सदर्हु अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत किंवा नियोजन प्राधिकरण वाढवून देईल अशा मुदतीत संबंधीत भुखंडधारकास गुंठेवारी विकास नियमाधिन करणेसाठी नियोजन प्राधिकरणाकडे अर्ज करता येईल, असे प्रावधान आहे. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम—४(२) नूसार भूखंडधारकाने त्यांचे भूखंडाच्या कब्जाबाबतचा व मालकीबाबतचा कायदेशिर पूरावा अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम —३(१) मधील परंतुकानूसार (क) मध्ये नमुदनूसार दि. ०१.०१.२००१ नंतर पाडण्यात आलेले व हस्तांतरीत करण्यात आलेले भुखंड गुंठेवारी विकास अधिनियमाअंतर्गत नियमाधिन करण्यास पात्र असणार नाहीत, असे नमुद आहे.

उक्त अधिनियमानूसार नागपूर शहराकरीता अनधिकृत अभिन्यासातील भूखंडाचे नियमितीकरण करण्यासाठी नागपूर सुधार प्रन्यासने एक खिडकी योजनेअंतर्गत दि. ०१.०६.२००२ ते दि. ३१.०८.२००२, दि. ०१.०१.२००३ ते दि. ३१.०१.२००३, १ ते दि. ३१.०५.२००३, दि. १०.०९. २००७ ते दि. ३१.१०.२००७ व दि. १४.११.२००७ या दरम्यान अर्ज मागविण्यात आलेले होते. त्यांचेकडे या दरम्यान प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत होती. तद्नंतर मुदतवाढीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली नसल्याने दिसून येते.

तथापी ज्यांनी त्या दरम्यान अर्ज सादर केलेले नाहीत व मंजुर केलेल्या अभिन्यासातील नियमितीकरणास पात्र असणारे व नागपूर सुधार प्रन्यासने जे भूखंड निहित केलेले आहेत. तथापी विक्री झालेली व मालकी असलेले भुखंडधारक आता नागपूर महानगरपालिकेकडे नियोजन प्राधिकरण म्हणून अर्ज सादर करीत आहे. नागपूर महानगरपालिकेकडे आता प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करणेस तांत्रिक अडचणी येत आहे. त्यामुळे उक्त अधिनियमानूसार नागपूर शहरातील अनधिकृत अभिन्यासातील पात्र भूखंडाचे नियमितीकरण करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) नूसार सहा महिण्याची अंतिमतः मुदतवाढ मंजुर करणे आवश्यक आहे. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम —७(१) व ७(२) मधील तरतुदीनूसार जर अभिन्यासातील नियमितीकरणास पात्र असणाऱ्या भुखंडधारकाने विहीत मुदतीत

नियोजन प्राधिकरणाकडे अर्ज सादर न केल्यास भूखंडधारकाने जागेवर केलेल्या अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करणेची तरतुद आहे. सदर बाब सुध्दा उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) नूसार मुदतवाढ मंजुर करणेची जाहिर सुचना प्रसिध्दवेळी करणे आवश्यक आहे.

नागपूर शहरातील गुंठेवारी अधिनियमानूसार मंजुर केलेल्या अभिन्यासातील भूखंडाचे नियमितीकरण करण्यासाठी नागपूर सुधार प्रन्यास प्रत्येक अर्जासोबत रू. १०००/— प्रमाणे तपासणी शुल्क सन २००२ पासून आकारत होती. गुंठेवारी अधिनिमयानूसार मंजुर केलेल्या अभिन्यासातील भूखंडाचे नियमितीकरण आजरोजी करावयाचे असल्याने सदर भूखंडधारकास वेळोवेळी दिलेली संधी/अवधी व त्यामध्ये त्यांनी केलेली दिरंगाई वा कसूर व त्यांनी भूखंडाचे नियमितीकरण न करून घेता उपभोगलेल्या सुविधा या बाबी विचारात घेता भूखंडधारकास त्याचा भुँदंड म्हणून शुल्कात वाढ करणे आवश्यक ठरते. तसेच भूखंड नियमितीकरणाच्या माध्यमातून जमा रक्कमेतून त्या भागात करावयाच्या मुलभूत सुविधेच्या कामास लागणारा निधी विचारात घेता नियमितीकरण करण्यासाठी जमा होणारा निधी अल्प आहे. तसेच सन २००२ पासून सन २०२० या कालावधी दरम्यान जमिनीच्या वाढलेल्या किंमती व दरवर्षी १०% प्रमाणे वाढलेले बाजारमुल्य तक्त्यातील दर विचारात घेता, सदर वाढ सरासरी १८ वर्षाकरीता १८०% होईल. तेव्हा रू. १०००/— प्रमाणे तपासणी शुल्क ही रक्कम फार कमी असल्याने त्या पटीत वाढ करणे आवश्यक आहे. वरील बाबी विचारात घेता उक्त अधिनियमानूसार नागपूर शहरातील नागपूर सूधार प्रन्यासने गुंठेवारी अधिनियमानूसार मंजुर केलेल्या अभिन्यासातील पात्र भूखंडाचे नियमितीकरण करण्यासाठी नविन अर्जाच्या तपासणी शुल्काची रक्कम रू. १०००/— ऐवजी रू. १५०००/— घेणे आवश्यक आहे. त्यामुळे नागपूर महानगरपालिकेकडील आर्थिक उत्पन्नात वाढ होवून सार्वजनिक सुविधेकरीता निधी उपलब्ध होईल. त्याअनुषंगाने याबाबतची सुचना वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

शासनाचे निर्णयानूसार गुंठेवारी अधिनियमानूसार प्रत्येक भूखंडाच्या नियमितीकरणाकरीता रू. ५६/—चौ.फुट प्रमाणे विकास शुल्क आकारणी करणेचे आदेशित केलेले आहे. तथापी या इतक्या कमी जमा रक्कमेतून त्या भागात मुलभुत संविधांची विकासकामे करणे अडचणीचे आहे. तेव्हा उक्त अधिनियमाच्या कलम —६(३) मधील तरतुदीनूसार Infrastructure Improvement Charges च्या माध्यमातून सदर विकास शुल्क दरात दुपटीने वाढ करणेच्या अनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर करणेकरीता मंजुरी प्रदान करणे आवश्यक आहे.

वरील बाबी विचारात घेता खालील विषयाबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

अ) गुंठेवारी अधिनियमानूसार नागपूर शहरातील अनधिकृत अभिन्यासातील पात्र भूखंडाचे नियमितीकरण करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम —४(१) नूसार सहा महिण्याची अंतिमतः मुदतवाढ मंजुर करणे.

ब) नागपूर सुधार प्रन्यासने गुंठेवारी अधिनियमानूसार मंजुर केलेल्या अभिन्यासातील पात्र भूखंडाचे नियमितीकरण करण्यासाठी नविन अर्जाच्या तपासणी शुल्काची रक्कम रू. १०००/— ऐवजी रू. १५०००/— घेणेस मंजुर प्रदान करणे.

क) गुंठेवारी अधिनियमाच्या कलम —६(३) मधील तरतुदीनूसार Infrastructure Improvement Chargesच्या माध्यमातून शासनाचे निर्णयानूसार मंजुर केलेल्या विकास शुल्क दरात दुपटीने वाढ करणेच्या अनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर करणेकरीता मंजुरी प्रदान करणे.

उपरोक्त विषय सभागृहाने विचारात घेतला

महापौरः- या विषयाबद्दल मा.निगम आयुक्त काही निवेदन करु इच्छितात.

निगम आयुक्त:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. विषय क्र. १६ च्या संदर्भात सध्या काही त्याचे रिवेलेन्ट राहिलेले आहे असे आम्हांला वाटते. मा.कॅबीनेटने दोन आठवडयापूर्वी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे गुंटेवारीचे सर्व विषय वापस

एनआयटीकडे वापस देत असल्यामुळे सध्यापुरते त्यांना मागे घेण्यासाठी सांगितले आहे. या संदर्भातील नोटीफिकेशन काही दिवसाने निर्गमित होणार आहे. एडीटीपीने या संदर्भात प्रस्ताव मांडावा आणि मा. सभागृहाच्या अनुमतीने मागे घेतला पाहिजे असे मला वाटते.

श्री. विजय झलके:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, हे नागपूर शहरातील सर्व गोरगरीब सर्वसामान्य जनतेचे ५७२ आणि १९०० लेआऊटमध्ये जे प्लॉट होते त्यानंतर २००१ मध्ये एनआयटीने गुंटेवारीची योजना आणली आणि गुंटेवारी योजना आणल्यानंतर ५७१ आणि १९०० मध्ये हे सगळे चालू झालेले आहे. त्यानंतर १ हजार रुपये भरण्याचा कार्यक्रम २००१ मध्ये सुरु झाला. त्यानंतर ज्यावेळेस २०१९ मध्ये महानगरपालिकेकडे हया गोष्टी आल्या. आता मा. आयुक्तांनी सांगितले हे सर्व एनआयटीला पुन्हा जाणार आहे. तशा पध्दतीचे अद्यापही काही परिपत्रक आलेले नाही. याबाबत आधी एडीटीपी विभागाने उत्तर दयावे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

निगम आयुक्त:-सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. सभागृहाला मी माहिती देवू इच्छितो, स्थायी समिती सभापती यांनी विचारल्याप्रमाणे अद्यापही नोटीफिकेशन निर्गमित झालेले नाही. मात्र याच्यात कॅबीनेट डीसीजन झालेले असल्यामुळे कोणत्याही क्षणी नोटीफिकेशन निर्गमित होवू शकतो. त्या पार्श्वभुमीवर आपण रेट फिकेशन करत गेलो. लोकांमध्ये अशाप्रकारचा काही संभ्रम निर्माण होवू शकतो. जोपर्यंत शासनाकडून क्लियारिटी होत नाही तोपर्यंत डिसीजन मागे ठेवावे असे मला वाटते.

श्री.संदीप जोशी:- पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, हया विषयात एनआयटीची वर्तवणुक अनेक वर्षापासून आपण सर्वांना याबाबत कल्पना आहे. ही वर्तवणुक माहीत असतांना एकीकडे मागील ५ वर्षामध्ये डीसीजन झाले आणि आता एनआयटी पुनर्जीवीत करण्याचा प्रयत्न महाविकास आघाडी सरकार करीत आहे. हे करीत असतांना जे काही डिसीजनआणि नोटीफिकेशन येईल ते त्यावेळेला येईल. परंतु सर्वसामान्य जनतेचा हिताचा प्रश्न आहे म्हणून गुंटेवारीचा हा संपुर्ण प्रश्न मंजूर करुन असाचा असा विषय आपण नागपूर सुधार प्रन्यासकडे पाठवून देवू. जर नोटीफिकेशन निघाले तर तो नागपूर सुधार प्रन्यासकडे तो वषय जाईल आणि नागपूर महानगरपालिकेने त्या काळात मंजूर केला असल्यामुळे तो त्यांना बाध्य राहील. कमीत कमी सर्वसामान्य जनतेच्या चांगला हिताचा प्रश्न नागपूर महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये घेण्यात आला आपण या पध्दतीने प्रशासनाने जो प्रस्ताव पाठविला आहे त्यामध्ये दुरुस्ती करुन या सुचनेसह मंजूर करुन नागपूर सुधार प्रन्यासकडे पाठवून दयावा.

श्री. विजय झलके:- मा.महापौरजी, माजी महापौर संदीपजी जोशी यांनी आपल्या निवेदनात यथायोग्य माहिती सांगितलेली आहे. हा जो विषय आहे. हा ज्या लोकांनी ५७२ आणि १९०० लेआऊट अतंर्गत गुंटेवारी योजनेचा लाभ त्या काळात घेवू शकले नाही काही लोक शहराबाहेर होते. काही लोक ज्यांचे प्रापर्टीचे डिस्पुट होते हे सर्व लोक जे ५७२ आणि १९०० या योजनेतून वंचित राहिलेले होते. त्यांना एक संधी उपलब्ध करुन देण्यासाठी या प्रस्तावाच्या माध्यमातून प्लॅटफार्म उपलब्ध करुन देत आहे. मा. संदीप जोशी यांनी सांगितले अद्यापही नोटीफिकेशन निघालेले नाही. महानगरपालिकेचा जो प्रस्ताव आहे तो जसाचा तसा मंजूर करुन तो एनआयटीला पाठवावा तो एनआयटीला मान्य करावा लागेल आणि त्याच्यामध्ये जे १५,००० रुपये रेट सांगितले आहे तो नागरिकांवर अतिरिक्त भुर्दंड न येवू देता, पहिले लोकांचे १ हजार रुपये भरण्याची योजना होती. त्यामध्ये अतिरिक्त आणखी १ हजार रुपये असे २ हजार रुपये शुल्क घेवून ज्या लोकांना ५७२ व १९०० लेआऊट योजनेअंर्तगत ज्या लोकांना लाभ घेता आला नाही त्यांना एक संधी या निमित्ताने उपलब्ध करुन दिली पाहिजे. मा. महापौरजी, अजूनही नोटीफिकेशन निघालेले नाही. हा प्रस्ताव जसाचा तसा मान्य करुन सर्व लोकांना २ हजार रुपये घेवून पुन्हा ५७२ आणि १९०० चे दर वाढवित आहे त्यादृष्टीने कार्यवाही करण्यासाठी हा प्रस्ताव मान्य केला पाहिजे. तसेच जे ५६ रुपये चे

दुप्पट म्हणजे ११२ रुपये चा जो विषय आहे. ते केवळ ५६ रुपये शुल्क आकारुन नागरिकांना त्यांचे प्लॉट नियमितीकरण योग्य रित्या करता आले पाहिजे अशा पध्दतीचा हा प्रस्ताव मान्य करावा अशी मी आपल्या मार्फत सभागृहाला विनंती करतो.

श्री. प्रविण दटके:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर. एनआयटी बरखास्त झाले पाहिजे या पध्दतीचा या सभागृहात अनेकदा एकमताने ठराव पास झाले आहे. याबाबत कुठल्याही प्रकारचे राजकीय पक्षामध्ये मतभेद नसतांना या सभागृहातील शिवसेना असेल, राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष असेल, भारतीय जनता पक्ष असेल, बहुजन समाज पक्ष असेल या सगळयांनी मुद्दा आणला. हे सर्व राजकीय पक्षाचा नेत्यांना माहीत होते. एनआयटी सारखी संस्थेने या शहराचा सत्यानाश केला यात कुठलेही राजकारण करण्याची गरज नाही. परंतु मा.महापौरजी बरखास्त झालेली एनआयटी पुनर्जीवीत केली तर यामध्ये सामान्य गोरगरीब ज्यांनी आपल्या पैश्यातून या ठिकाणी प्लॉट घेतले त्यांचे प्लॉट नियमितीकरण नाही, प्लॉटचा आरएल नाही. या शहरातील आऊटर भागाचा या संस्थेने पुर्णत: सत्यानाश केला. तेथील राहणा-या गोरगरीब लोकांना त्रास दिला त्याबाबतचा चांगला निर्णय या सभागृहाच्या माध्यमातून सभागृहामध्ये झाला आहे. मा.महापौरजी, १ हजार रुपयाचे २ हजार करावे परंतु ५६ रुपये चे ५६ रुपयेच ठेवावेत. त्या करिता राज्य सरकारकडे आपण एक प्रस्ताव पाठवावा, एनआयटी पुनर्जीवीत करण्याने गोरगरीब लोकांना यात जी अडचण होणार आहे या अनुषंगांने मी याचा निषेध करतो. या सभागृहाच्या माध्यमातून सभागृहाच्या सर्व मा.सदस्यांना विनंती आहे. आपण मायबाप सरकारकडे आदरणीय मुख्यमंत्री, आदरणीय उप मुख्यमंत्री, मा. पालकमंत्री यांच्याकडे परत एकदा सभागृहामार्फत विनंती करावी. शहरातील आतमधील भाग हा महानगरपालिकेकडेच ठेवावा जेणेकरुन आपल्या शहराचा एकसंघ विकास होईल अशी आपल्याला विनंती आहे. मा.सभागृहाच्या माध्यमातून मग ते शिवसेना नेता असतील, राष्ट्रवादी पक्षाचे नेता असतील, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नेता असतील, यात कुठलेही राजकारण, कुठल्याही मताचा विषय नाही. गोरगरीब जनता जी आऊटर भागात राहते त्यांच्या करिता एकसंघ या मायबाप सरकारला विनंती करु. प्रशासन आपल्या सोबत आहे. या शहराच्या आतमधील भागाकरिता एकच विकास संस्था असावी असा आग्रह असतांना आपण दुसरीकडे एनआयटीचे पुनर्जीवन करीत आहे. याकरिता आपल्या सरकारकडे आदरणीय मुख्यमंत्री, पालकमंत्री महोदयाकडे मा. महापौरजी यांच्या नेतृत्वात एक निवेदन सभागृहाच्या माध्यमातून देण्यात यावे अशी सभागृहाला विनंती आहे.

श्री. विरेंद्र कुकरेजा:- मा.महापौरजी, हम आऊटर क्षेत्रो के नगरसेवक है। हमारे आऊटर क्षेत्रो के जितने भी नगरसेवक है उनको गुंटेवारी के क्षेत्र बहोत बडे पैमाने मे उनके प्रभाग मे लगते है। और जो विकास शुल्क का विषय आया है की जो १ हजार रुपये है उस को १५,००० हजार रुपये करने का लेकिन उसको १५,००० हजार न करते हुए २ हजार रुपये करने चाहिए ऐसे मै प्रभाग की जनता की ओर से विंनती करता हूँ और जो प्रविणजीने कहा उसको ध्यान रखते हुए की एनआयटी फिर से पुनर्जीवीत न करते हुए आऊटर भागो के लिए एकही अॅथारिटी रहनी चाहिए। क्योंकि अलग अलग डेव्हल्पमेंट अॅथारिटी रहने के वजह से बहोत अडचणे आती है। इसलिए एनआयटी पुर्ण रुप से बरखास्त होना चाहिए ऐसा निवेदन मा. महापौरजी के माध्यम से मा. मुख्यमंत्री, मा. पालकमंत्री को भेजा जाये ऐसी मै सभागृह के माध्यम से विनंती करता हूँ।

महापौर:- मा.विरोधी पक्ष नेता यांनी आपले मत दयावे.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, गुंठेवारीचा जो मुद्दा आहे. मा.आयुक्तांनी जे मत व्यक्त केले आहे की तो ठराव मंत्रीमंडळाचा झालेला आहे. त्यामध्ये हा प्रश्न येतो की एनआयटीचे जर पुनर्जीवन जर झाले तर नागरिकांना यामध्ये त्रास होवू नये. आणि जो १ हजार रुपये आहेत ते २ हजार रुपये करण्याचा प्रस्ताव पारीत करण्यात यावा जेणेकरुन नागरिकांना याच्यात न्याय मिळेल यादृष्टीने पुढील कार्यवाही करावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री. संदीप जाधव:- मा.महापौरजी, या विषयावर आमचे जेष्ठ नगरसेवक मा. प्रविण दटके, स्थायी समिती अध्यक्ष श्री. विजय झलके असतील, माजी महापौर श्री.संदीप जोशी असतील, विरोधी पक्ष नेता श्री. तानाजी वनवे असतील यांनी या

संदर्भात सांगितले आहे आणि महानगरपालिकेचे घोषवाक्य आहे. `पौर जन हिताय' शहराच्या जनतेचे हित लक्षात घेता १५ हजार रुपये जो रेट लावलेला आहे त्या संदर्भात मला म्हणावयाचे आहे की नागपूर शहरात असे अनेक लोक आहेत त्यावेळेस ज्या लोकांनी नियमितीकरणासाठी पैसे भरलेले नव्हते. त्यांच्या अनेक अडचणी असू शकतात. परंतु जेव्हा एनआयटी महानगरपालिकेमध्ये मर्च झाली त्यावेळेस शहरातील नागरिकांना मोठया प्रमाणात दिलासा मिळाला. नागपूर शहरातील अनेक लोक अनेक वर्षापासून या एनआयटीच्या कार्यपध्दतीमुळे पीडीत होते. एनआयटी पुनर्जीवीत करण्याच्या संदर्भात या महाविकास आघाडीमध्ये पालकमंत्री नितीन राऊत यांनी ते काम केले. १५ हजार रुपये रेट जो प्रस्तावित आहे. १ हजार रु. नियमितीकरणासाठी भरावयाचे असल्यामुळे केवळ १ हजार रुपये वाढ करुन आणि जे ५६ रुपयाची डिमांड भरावयाची आहे ती ५६ रुपयेच ठेवावी अशी आपल्याला जनतेच्या वतीने विनंती आहे. मा.महापौरजी , हा विषय आज एकमताने मंजूर करावा अशी आपल्याला विनंती करतो.

महापौर:- हा विषय सभागृहाच्या पटलावर आल्यानंतर मा.आयुक्त महोदयांनी आपली भुमिका सभागृहाच्या समोर आणली. परंतु सध्याच्या स्थितीत शासनाचा कोणताही जी.आर. किंवा परिपत्रक महानगरपालिकेला अपात्र आहे. याचा अर्थ असा आहे सध्या निर्णय घेण्याचे अधिकार महानगरपालिकेच्या स्वाधीन आहे ही बाब लक्षात घेवून आजची ही सभा हा प्रस्ताव मंजूर करीत आहे.

वरील चर्चेनंतर महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधिन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम —२००१ मधील तरतुदीनूसार पुढील सहा महिण्याकरीता मुदतवाढ देणे, प्रकरणाच्या तपासणी शुल्कात वाढ करणेबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासननिर्णय क्र. टिपीएस—२४९६—२६४३—प्र.क्र. ३००(अ)—९७—नवि—९, दि.०७.०१.२००० अन्वये भागश: मंजुर झालेली असून दि.०१.०३.२००० पासून अंमलात आलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस—२४००—१६२८—प्र.क्र.२००—नवि—९, दि. १०.०९.२००१ अन्वये मंजुर झालेली असून दि. २१.०९.२००१ पासून अंमलात आलेली आहे.तसेच शासन निर्णय क्र. टिपीएस—२४०१—८५५—प्र.क्र. ७६—नवि—९, दि. २७.०२.२००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यास क्षेत्रातंर्गत ७ योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तसेच नागपूर शहराच्या संपुर्ण क्षेत्रामध्ये गुंठेवारी विकासाचे नियंत्रण व नियमितीकरण नागपूर सुधार प्रन्यासकडून करणेबाबत शासनाने निर्देश क्र. गुंठेवा—१००२/१५४०/प्र.क्र.३५६/२०००/नवि—३०, दि. ०६.१२.२००२ अन्वये कळविलेले होते. तसेच गुंठेवारी अधिनियमाअंतर्गत नियमाधिन केलेल्या भुखंडावर बांधकाम परवानगी देणे व विकास आकार वसुल करून त्या भागातील विकास कामे करण्याचे अधिकार शासनाने दि. १०.०१.२००३ रोजीच्या पत्रान्वये नागपूर सुधार प्रन्यासला दिलेले होते.

आता शासन निर्णय क्र. टिपीएस—२४१९—१४१९—प्र.क्र. १५४—२०१९—नवि—९, दि. २७.०८.२०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यास क्षेत्रांअंतर्गत ७ योजनांचे क्षेत्राकरीता नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. त्यानूसार नागपूर शहराच्या संपुर्ण हद्दीतील गुंठेवारी अधिनियमाअंतर्गत मंजुर अभिन्यासातील भूखंडे नियमित करणे व नियमाधिन केलेल्या भूखंडावर बांधकाम परवानगी देणेची कार्यवाही नागपूर सुधार प्रन्यासकडून प्राप्त प्रकरणी नागपूर महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधिन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम —२००१, दि. ३०.०४.२००१ पासून अंमलात आला असून उक्त अधिनियमाच्या कलम —३ अन्वये नियमितीकरणास पात्र असणाऱ्या भुखंडधारकाने उक्त अधिनियमाच्या कलम —४ अन्वये भूखंड नियमितीकरणास नियोजन प्राधिकरणाकडे त्याबाबतीत अर्ज करणे आवश्यक आहे. उक्त अधिनियमाच्या कलम —४(१) नूसार सदर्हु अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत किंवा नियोजन प्राधिकरण वाढवून

देईल अशा मुदतीत संबंधीत भुखंडधारकास गुंठेवारी विकास नियमाधिन करणेसाठी नियोजन प्राधिकरणाकडे अर्ज करता येईल, असे प्रावधान आहे. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम—४(२) नूसार भूखंडधारकाने त्यांचे भूखंडाच्या कब्जाबाबतचा व मालकीबाबतचा कायदेशिर पूरावा अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम —३(१) मधील परंतुकानूसार (क) मध्ये नमुदनूसार दि. ०१.०१.२००१ नंतर पाडण्यात आलेले व हस्तांतरीत करण्यात आलेले भुखंड गुंठेवारी विकास अधिनियमाअंतर्गत नियमाधिन करण्यास पात्र असणार नाहीत, असे नमुद आहे.

उक्त अधिनियमानूसार नागपूर शहराकरीता अनधिकृत अभिन्यासातील भूखंडाचे नियमितीकरण करण्यासाठी नागपूर सुधार प्रन्यासने एक खिडकी योजनेअंतर्गत दि. ०१.०६.२००२ ते दि. ३१.०८.२००२, दि. ०१.०१.२००३ ते दि. ३१.०१.२००३, १ ते दि. ३१.०५.२००३, दि. १०.०९. २००७ ते दि. ३१.१०.२००७ व दि. १४.११.२००७ या दरम्यान अर्ज मागविण्यात आलेले होते. त्यांचेकडे या दरम्यान प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत होती. तद्नंतर मुदतवाढीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली नसल्याने दिसून येते.

तथापी ज्यांनी त्या दरम्यान अर्ज सादर केलेले नाहीत व मंजुर केलेल्या अभिन्यासातील नियमितीकरणास पात्र असणारे व नागपूर सुधार प्रन्यासने जे भूखंड निहित केलेले आहेत. तथापी विक्री झालेली व मालकी असलेले भुखंडधारक आता नागपूर महानगरपालिकेकडे नियोजन प्राधिकरण म्हणून अर्ज सादर करीत आहे. नागपूर महानगरपालिकेकडे आता प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करणेस तांत्रिक अडचणी येत आहे. त्यामुळे उक्त अधिनियमानूसार नागपूर शहरातील अनधिकृत अभिन्यासातील पात्र भूखंडाचे नियमितीकरण करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) नूसार सहा महिण्याची अंतिमत: मुदतवाढ मंजुर करणे आवश्यक आहे. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम —७(१) व ७(२) मधील तरतुदीनूसार जर अभिन्यासातील नियमितीकरणास पात्र असणाऱ्या भुखंडधारकाने विहीत मुदतीत नियोजन प्राधिकरणाकडे अर्ज सादर न केल्यास भूखंडधारकाने जागेवर केलेल्या अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करणेची तरतुद आहे. सदर बाब सुध्दा उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) नूसार मुदतवाढ मंजुर करणेची जाहिर सुचना प्रसिध्दवेळी करणे आवश्यक आहे.

नागपूर शहरातील गुंठेवारी अधिनियमानूसार मंजुर केलेल्या अभिन्यासातील भूखंडाचे नियमितीकरण करण्यासाठी नागपूर सुधार प्रन्यास प्रत्येक अर्जासोबत रू. १०००/— प्रमाणे तपासणी शुल्क सन २००२ पासून आकारत होती. गुंठेवारी अधिनिमयानूसार मंजुर केलेल्या अभिन्यासातील भूखंडाचे नियमितीकरण आजरोजी करावयाचे असल्याने सदर भूखंडधारकास वेळोवेळी दिलेली संधी/अवधी व त्यामध्ये त्यांनी केलेली दिरंगाई वा कसूर व त्यांनी भूखंडाचे नियमितीकरण न करून घेता उपभोगलेल्या सुविधा या बाबी विचारात घेता भूखंडधारकास त्याचा भुंर्दड म्हणून शुल्कात वाढ करणे आवश्यक ठरते. तसेच भूखंड नियमितीकरणाच्या माध्यमातून जमा रक्कमेतून त्या भागात करावयाच्या मुलभूत सुविधेच्या कामास लागणारा निधी विचारात घेता नियमितीकरण करण्यासाठी जमा होणारा निधी अल्प आहे. तसेच सन २००२ पासून सन २०२० या कालावधी दरम्यान जमिनीच्या वाढलेल्या किंमती व दरवर्षी १०% प्रमाणे वाढलेले बाजारमुल्य तक्त्यातील दर विचारात घेता, सदर वाढ सरासरी १८ वर्षाकरीता १८०% होईल. तेव्हा रू. १०००/— प्रमाणे तपासणी शुल्क ही रक्कम फार कमी असल्याने त्या पटीत वाढ करणे आवश्यक आहे. वरील बाबी विचारात घेता उक्त अधिनियमानूसार नागपूर शहरातील नागपूर सूधार प्रन्यासने गुंठेवारी अधिनियमानूसार मंजुर केलेल्या अभिन्यासातील पात्र भूखंडाचे नियमितीकरण करण्यासाठी नविन अर्जाच्या तपासणी शुल्काची रक्कम रू. १०००/— ऐवजी रू. १५०००/— घेणे आवश्यक आहे. त्यामुळे नागपूर महानगरपालिकेकडील आर्थिक उत्पन्नात वाढ होवून सार्वजनिक सुविधेकरीता निधी उपलब्ध होईल. त्याअनुषंगाने याबाबतची सुचना वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

शासनाचे निर्णयानूसार गुंठेवारी अधिनियमानूसार प्रत्येक भूखंडाच्या नियमितीकरणाकरीता रू. ५६/—चौ.फुट प्रमाणे विकास शुल्क आकारणी करणेचे आदेशित केलेले आहे. तथापी या इतक्या कमी जमा रक्कमेतून त्या भागात मुलभुत संविधांची विकासकामे करणे अडचणीचे आहे. तेव्हा उक्त

अधिनियमाच्या कलम —६(३) मधील तरतुदीनूसार Infrastructure Improvement Charges च्या माध्यमातून सदर विकास शुल्क दरात दुपटीने वाढ करणेच्या अनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर करणेकरीता मंजुरी प्रदान करणे आवश्यक आहे.

वरील बाबी विचारात घेता खालील विषयाबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

अ) गुंठेवारी अधिनियमानूसार नागपूर शहरातील अनधिकृत अभिन्यासातील पात्र भूखंडाचे नियमितीकरण करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम —४(१) नूसार सहा महिण्याची अंतिमत: मुदतवाढ मंजुर करणे.

ब) नागपूर सुधार प्रन्यासने गुंठेवारी अधिनियमानूसार मंजुर केलेल्या अभिन्यासातील पात्र भूखंडाचे नियमितीकरण करण्यासाठी नविन अर्जाच्या तपासणी शुल्काची रक्कम रू. १०००/— ऐवजी रू. १५०००/— घेणेस मंजुर प्रदान करणे.

क) गुंठेवारी अधिनियमाच्या कलम —६(३) मधील तरतुदीनूसार Infrastructure Improvement Chargesच्या माध्यमातून शासनाचे निर्णयानूसार मंजुर केलेल्या विकास शुल्क दरात दुपटीने वाढ करणेच्या अनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर करणेकरीता मंजुरी प्रदान करणे.

उपरोक्त विषय सभागृहाने विचारात घेऊन नागपूर सुधार प्रन्यासने गुंठेवारी अधिनियमानुसार मंजूर केलेल्या अभिन्यासातील पात्र भुखंडाचे नियमतीकरण करण्यासाठी नविन अर्जाच्या तपासणी शुल्काची रक्कम रु १५,००० /- ऐवजी २०००/- रु. घ्यावी तसेच प्रत्येक भूखंडाच्या नियमितीकरणाकरीता रु ११२ /- चौ.फुट ऐवजी ५६/- चौ.फुट प्रमाणे विकास शुल्क आकारणी करण्यात यावी या मा.सत्तापक्ष नेता श्री.संदीप जाधव यांनी केलेल्या सूचनेसह हा विषय मंजूर करण्यात येते या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.४७/ वि.क्र.१७</u> :- {आरोग्य विभाग}** नागपूर शहरामध्ये वाढत्या नागरीकांमुळे शहराची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येचा ताण शहरातील पायाभुत सुविधांवर पडतो तसेच अतिक्रमणाची संख्या वाढणे, कचऱ्यांचे प्रमाण वाढणे, उघडयावरती कचरा फेकण्याचे प्रमाण वाढणे, उघडयावर जनावरे बांधणे त्यामुळे अस्वच्छतेचे उपद्रव निर्माण होतात तसेच नागरीकांकडून बिनापरवाना होर्डींग्स उभारणे, बांधकामाचा मलबा रस्त्यावर टाकणे, थुकणे, घाणी फेकणे, व्यवसायीकांनी, ठेलेवाल्यांनी परीसर अस्वच्छ करणे, इत्यादी प्रकारही घडत असतात. अशा प्रकारचा उपद्रव शाधून काढून त्यावर वेळीच दंडनिय कार्यवाही केल्यास शहर परिसरात स्वच्छता व शिस्तीचे वातावरण निर्माण होवू शकते. या दृष्टीने अणुषंगीक चर्चेत मा. तत्कालीन आयुक्तांनी उपद्रव शोध पथक (Nuisance Detection Squad) निर्माण करण्याचा प्रस्ताव स्थायी समिती पुढे सादर करण्याचा सुचना त्याप्रमाणे प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे सादर करण्यात आले होते.

विषय धोरणात्मक असल्यामुळे मा. तत्कालीन आयुक्त यांनी प्रस्ताव निर्णयासाठी महासभेपुढे सादर करण्याकरीता निर्देश दिले. त्या अणुषंगाने विषय महासभेपुढे ठेवण्यात आले व म.न.पा. ठराव क्र. ५३ दि. २०/०६/२०१७ अन्वये एकुण १५१ सुरक्षा रक्षक ठेवण्याकरीता महासभेने मंजुरी प्रदान केली.

परंतु नागपूर शहराच्या वाढत्या जनसंख्येचे ताण शहरातील पायाभुत सुविधांवर सतत वाढत असल्याने त्यावर रोक लावण्याकरीता मा. स्थायी समिती ठराव क्र. ६७३ दि. २९/११/२०१९ अंतर्गत मा. स्थायी समितीने १५१ मध्ये ५० सुरक्षा रक्षकांची भर करून एकुण २०१ सुरक्षा रक्षक करण्याचा दुरूस्ती विषयास मा. स्थायी समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली व त्या नुसार सुरक्षा रक्षकांची कंत्राटी भरती सुध्दा करण्यात आली.

म.न.पा. ठराव क्र. ६७३ दि. २९/११/२०१९ अन्वये प्रथम १५१ मध्ये ५० ची भर करून २०१ सुरक्षा रक्षकाच्या मा. स्थायी समितीच्या मंजुरीला मा. महासभेची मंजुरी मिळण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्याच्या मंजुरीस्तव सादर प्रस्तुत प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्री.संदीप जाधव:- मा.महापौरजी, यामध्ये वयाची अट आहे त्यामध्ये मला काही सुचना करावयाची आहे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, मला एनडीएसच्या कार्यप्रणालीवर प्रशासनाची काय भुमिका आहे ते त्यांनी स्पष्ट करावे.

महापौर:- एनडीएसच्या कार्यप्रणालीवर प्रशासनाची काय भुमिका आहे ते कृपया स्पष्ट करावे. समाधानकारक आहे किंवा त्यात काही सुधारले पाहिजे ते स्पष्ट करावे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, या विभागाच कोण उपायुक्त आहे. दासरवार साहेब उपायुक्त असतील आणि ते उत्तर देत असतील तर काही हरकत नाही. परंतु या विभागाच्या अनेक तक्रारी आहेत. अतिक्रमणाच्या बाबतीत एनडीएसमार्फत होणा-या कार्यवाहीच्या बाबतीतील तक्रारीच्या अनुषंगाने विरोधी पक्ष नेत्याने प्रश्न उचललेला आहे. एक्स् सर्विस मॅनच्या बाबतीत चुकीची माहिती बाहेर जावी आणि त्यांचाआदर कमी होवू नये म्हणून प्रशासनाची भुमिका असेल तर योग्य ते सक्षम असल्यास मला काही हरकत नाही तसा तत्सम अधिका-याने विषय ठेवावा.

श्री.संदीप जोशी:- मा. महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, हे काम करीत असतांना यांच्या कामाची काही वर्कलिस्ट झालेली आहे काय? यांचे काही उदिदष्ट ठरलेले आहे काय? आयुक्तांच्या सेक्युरिटीमध्ये दहा-दहा एनडीएसचे कर्मचारी राहतात हे सत्य आहे. आणि आयुक्तांच्या सेक्युरिटीमध्ये दहा-दहा एक्स सर्विस मॅन राहावे यासाठी सभागृहाने मंजूरी दिलेली आहे काय? याचे सुध्दा कॅरिफिकेशन प्रशासनाने दयावे.

महापौर:- प्रशासनाला निर्देश देण्यात येते की कोणता हेतू लक्षात घेता एनडीएसची नियुक्ती केलेली आहे. त्यांना दिलेला कामाचा तपशील आणि त्यांच्या कामाबद्दल प्रशासनाचे काय मत आहे ते सभागृहाच्या समोर संबंधित उपायुक्त असलेल्या अधिका-याने सभागृहासमोर मांडावयाचे आहे.

श्री.दासरवार(उपायुक्त):- मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेमध्ये एक्स सर्विसमॅनची नियुक्ती करण्यात आली. कचरा करणे किंवा घाण करणे, किंवा कोणत्याही प्रकारची उपद्रव याकरिता एनडीएसची नियुक्ती करण्यात आली आहे. एनडीएसची नियुक्ती करतांना मा.स्थायी समितीची मान्यता घेतलेली आहे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, उपद्रव कोणत्या कोणत्या प्रकारचा आहे त्याचे वाचन करावे.

महापौर:- कार्यपध्दती आणि दिलेली जबाबदारी याचा स्पष्ट उल्लेख करावा.

श्री. विजय(पिंटू) झलके:- मा. महापौरजी, स्थायी समिती समोर हा प्रस्ताव आला होता त्यावेळी याच्यामध्ये स्पष्ट उल्लेख केला आहे की एनडीएसच्या टीमने नागरिकांसोबत व नगरसेवकांसोबत गैरवर्तवणुकीच्या तक्रारी प्राप्त झालेल्यामुळे दर महिन्याचा अति.आयुक्तांनी याबाबतचा अहवाल स्थायी समितीच्या पटलावर ठेवावा. अद्यापही याबाबतचा अहवाल स्थायी समितीच्या पटलावर आलेला नाही याबाबत सुध्दा प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.दासरवार(उपायुक्त):- मा.महापौरजी, याच्यामध्ये पहिला प्रश्न होता कोणकोणते उपद्रव आहेत त्याच्यामध्ये कचरा करणे, घाण करणे, अस्वच्छता करणे, बिल्डींग मटेरियल ठेवणे, अवैधरित्या उपद्रव करणे इत्यादि गोष्टी फाईलमध्ये नमुद केलेल्या आहेत. फाईन त्यांच्याद्वारे केल्या जाते. त्यानंतर मा.स्थायी समिती अध्यक्षांनी विषय ठेवलेला आहे दर महिन्याचा अहवाल सादर करणे बाबत, अहवाल अद्यापही सादर केलेला नाही.

श्री.संदीप जोशी:- मा. महापौरजी, एनडीएसच्या कार्यप्रणाली संबंधित माझ्या प्रश्नाचे उत्तर राहिलेले आहे. आठ महिन्यापूर्वी यापूर्वीच्या आयुक्तांच्या सेक्युरिटीकरिता एनडीएसचे कर्मचारी लावले त्यांना लावण्याची जबाबदारी कुणाची होती.

श्री.दासरवार(उपायुक्त):- मा.महापौरजी, हेड क्वार्टरमध्ये घाण करणे आणि थुंकण्याच्या तक्रारी येत होत्या म्हणून आपल्या परिसरामध्ये दोन टीम लावलेल्या होत्या.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, पाईट ऑफ आर्डर. मा.महापौरजी, एनडीएसच्या बाबतीत मा. संदीप जोशी बोलले.

एनडीएसचा परफार्म अत्यंत खराब आहे. ते हिटलरशाही प्रमाणे काम करतात. त्यांना कंटीन्यु करु नये. शांतीनगरमध्ये त्यांची वागणूक अशा प्रकारची आहे की मी कुणाला ओळखत नाही. माझा काही संबंध नाही. मी माझे काम करणार आहे. जे लोक त्यांना पैसे देतात त्यांच्यावर कार्यवाही करीत नाही परंतु जे लोक पैसे देत नाही त्यांच्यावर ते जबरदस्तीने कार्यवाही करतात. कोव्हीडच्या काळात त्यांनी जनतेवर अन्याय केला आहे. त्यांच्या मनमर्जीप्रमाणे त्यांनी लोकांना त्रास दिलेला आहे. लोकांना मारण्यापासून सगळे काम यांनी केलेले आहे. आम्ही मिल्ट्रीच्या लोकांचा सन्मान करतो परंतु ते माणुसकी सोडून अशा पध्दतीने काम करीत असतील तर आम्ही त्यांचा निषेध करतो. त्यांना बिल्कुल कंटीन्यु करु नये अशी माझी विनंती आहे.

महापौर:- दासरवार साहेब विरोधी पक्ष नेत्यांनी विषय मांडला त्या संदर्भात प्रशासनाने उत्तर सांगावे

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, मा. महापौरजी, जर माजी महापौरजी यांची तक्रार आहे तर दासरवारसाहेबांना माझी विनंती आहे. सीसीटीव्ही कॅमेरे लागलेले आहे. आयुक्तांच्या कॅबीनसमोर एनडीएसचे किंती कर्मचारी राहत होते ते तपासून घेतले पाहिजे. दासरवार साहेब परत एकदा खोटे बोलत आहेत. आम्हांला प्रशासनासोबत भांडण करावयाचे नाही. आमचे कुणाशीही व्यैयक्तिक भांडण नाही. परंतु नगरसेवकांना आयुक्तांच्या कॅबीनमध्ये जातांना अडविणारे हे एनडीएसचे लोक आहे. नगरसेवकांना पाचच्यावरती जावू न देणारे हे सगळे एनडीएसचे लोक होते

श्री.संदीप जोशी:- मा. महापौरजी, महिला नगरसेवकांच्या पर्स तपासणारे हे एनडीएसचे लोक होते.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, आयुक्तांचा ड्रायव्हर हा क्लर्क झाला त्यामध्ये प्रशासनची काय भुमिका होती. मा. तानाजी वनवे सर्वोच्च जेष्ठ नगरसेवक या सभागृहाचे आहे. माजी महापौर श्री. संदीपजी जोशी हे या सभागृहाचे मा.सदस्य आहेत. आपण सुध्दा सुरेश भट सभागृहामध्ये सांगितले आहे. त्यामुळे एक्स सर्विसमॅन लावावयाचे असतील तर याबाबत मंजूरी करण्याआधी याचे नियम, निकष त्यांच्यावर अन्य कार्यवाही हे सगळे आपल्या स्तरावर बोलून एक समिती गठीत करावी आणि संबंधित सर्व बाबी समितीकडे पाठवावे आणि हे सर्व तपासून घ्यावे. कारण यांच्यामध्ये बिल्कूल माणुसकी नाही. हे नियम, निकषाप्रमाणे वागण्यास तयार नाही. त्यामुळे माझे स्पष्ट म्हणणे आहे की जे कर्मचारी चांगले काम करतात त्यांच्याबाबतीत माझे काही म्हणणे नाही परंतु जे वाईट काम करतात त्यामुळे महानगरपालिकेची बदनामी होते. महानगरपालिका 'पौर जन हिताय' करता काम करते त्यामुळे या अपेक्षाप्रमाणे काम होत नसेल तर सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यावा अशी मी आपल्या माध्यमातून सभागृहाला विनंती करतो.

वरील चर्चेनंतर नागपूर शहरामध्ये वाढत्या नागरीकांमुळे शहराची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येचा ताण शहरातील पायाभुत सुविधांवर पडतो तसेच अतिक्रमणाची संख्या वाढणे, कचऱ्यांचे प्रमाण वाढणे, उघडयावरती कचरा फेकण्याचे प्रमाण वाढणे, उघडयावर जनावरे बांधणे त्यामुळे अस्वच्छतेचे उपद्रव निर्माण होतात तसेच नागरीकांकडून बिनापरवाना होर्डींग्स उभारणे, बांधकामाचा मलबा रस्त्यावर टाकणे, थुकणे, घाणी फेकणे, व्यवसायीकांनी, ठेलेवाल्यांनी परीसर अस्वच्छ करणे, इत्यादी प्रकारही घडत असतात. अशा प्रकारचा उपद्रव शाधून काढून त्यावर वेळीच दंडनिय कार्यवाही केल्यास शहर परिसरात स्वच्छता व शिस्तीचे वातावरण निर्माण होवू शकते. या दृष्टीने अणुषंगीक चर्चेत मा. तत्कालीन आयुक्तांनी उपद्रव शोध पथक (Nuisance Detection Squad) निर्माण करण्याचा प्रस्ताव स्थायी समिती पुढे सादर करण्याचा सुचना त्याप्रमाणे प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे सादर करण्यात आले होते.

विषय धोरणात्मक असल्यामुळे मा. तत्कालीन आयुक्त यांनी प्रस्ताव निर्णयासाठी महासभेपुढे सादर करण्याकरीता निर्देश दिले. त्या अणुषंगाने विषय महासभेपुढे ठेवण्यात आले व म.न.पा. ठराव क्र. ५३ दि. २०/०६/२०१७ अन्वये एकुण १५१ सुरक्षा रक्षक ठेवण्याकरीता महासभेने मंजुरी प्रदान केली.

परंतु नागपूर शहराच्या वाढत्या जनसंख्येचे ताण शहरातील पायाभुत सुविधांवर सतत वाढत असल्याने त्यावर रोक लावण्याकरीता मा. स्थायी समिती ठराव क्र. ६७३ दि. २९/११/२०१९ अंतर्गत मा. स्थायी समितीने १५१ मध्ये ५० सुरक्षा रक्षकांची भर करून एकुण २०१ सुरक्षा रक्षक करण्याचा

दुरूस्ती विषयास मा. स्थायी समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली व त्या नुसार सुरक्षा रक्षकांची कंत्राटी भरती सुध्दा करण्यात आली.

म.न.पा. ठराव क्र. ६७३ दि. २९/११/२०१९ अन्वये प्रथम १५१ मध्ये ५० ची भर करून २०१ सुरक्षा रक्षकाच्या मा. स्थायी समितीच्या मंजुरीला मा. महासभेची मंजुरी मिळण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्याच्या मंजुरीस्तव सादर प्रस्तुत प्रश्न सभागृहाने विचारात घेवून पूर्व सैनिकांना नेमले पाहिजे हे या सभागृहाचे एकमत आहे. हे करीत असतांना एक आचारसंहितेची निर्मिती झाली पाहिजे जर यांचे गैरवागणुकीचे प्रकरण प्रशासनाच्या समोर आले तर प्रशासनामार्फत काय कार्यवाही झाली पाहिजे याचे निर्देश सुध्दा जेव्हा आपण यांना नोकरीवर ठेवतो तेव्हा देणे नितांत आवश्यक आहे. यांच्या गैरवर्तणुकीवर निर्बंध करण्यासाठी एक समिती निर्धारित करणे हे सुध्दा आवश्यक वाटते. या समितीत ५ लोकांचा समावेश करावा त्यात सभागृहाचे ३ सदस्य आणि महानगरपालिका प्रशासनातील २ अधिकारी ठेवण्याचा निर्देश देतो. सोबतच स्थायी समितीने जी सुचना केली आहे त्या सुचनेचा काटेकोरपणे पालन झाले पाहिजे. एखादया सामाजिक संस्थेला जर एखादी जबाबदारी दिली तर त्यांना आपण दर महिन्याचा अहवाल मागतो तसेच यांनाही काम देत असतांना यांना दर महिन्याचा अहवाल संबंधित जो कुणी प्रशासकीय अधिकारी आहे ज्यांच्याकडे जबाबदारी आहे यांच्यापर्यंत आले पाहिजे त्यांनी त्याचे निकष ठरविले पाहिजे त्यांना जर त्यांच्या कामामध्ये त्रृटी आढळली , जर गैरप्रकार आढळला तर त्यादृष्टीने कार्यवाही करायला पाहिजे. सन्माननीय सत्तापक्ष नेता यांनी सुचना दिलेली आहे याच्यात जी वयाची अट आहे की रिटायर्ड झाल्याच्या १० वर्षानंतर त्यांच्यात त्यांनी सुचना दिलेली आहे याच्यात ग्राहय करावे. हे ग्राहय करीत असतांना एक्स सर्विस मॅनला दुस-या नोकरीत ठेवत असतांना शासनाचे काही निकष आणि निर्देश आहेत काय? याची चाचणी करुन हा सुधार करण्यात यावा या सर्व सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात यावा. या मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.४८/ वि.क्र.१८</u> :- {लोककर्म विभाग}**

प्रभाग क्र. 18 महाल, एम.सी.ई.बी. ऑफीस जवळील पुलाच्या बांधकामातील उर्वरीत जागेवर खसरा क्र. 337 शिट क्र. 254 येथे (10.00 x 5.60 = 56.00 चौ.मी.) सुलभ इंटरनॅशनल या संस्थे ला सुलभ शौचालयाचे बांधकामासाठी ३० वर्षाकरिता विनामुल्य लिजवर देखभाल व दुरूस्तीचे अटीवर ३० वर्षाचा कालावधी करीता त्याचप्रमाणे ३० वर्षाच्या कालावधीनंतर सदरील शौचालयाच्या ताबा महानगरपालिकेस हंस्तातरीत करणे या अटीवर सुलभ शौचालयाचे बांधकाम करण्यास मंजूरी देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.४९/ वि.क्र.१९</u> :- {सचिवालय }**

महानगरपालिकेतील मागासवर्गीयांसाठी कल्याणकारी योजना वरिल खर्च योग्य प्रकारे होते किंवा नाही याकडे लक्ष वेधन्यासाठी नगरसेवकापैकी जे नगरसेवक मागासवर्गीयांतील असतील अश्या 11 सदस्यीय त्यात भारतीय जनता पक्षाचे 8 सदस्य, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षाचे 2 सदस्य व बहुजन समाज पक्षातील 1 सदस्य राहतील अशी दुर्बल घटक समिती सन 2021–2022 करिता गठीत करण्याचा प्रश्न विचारात घेतला

( मा.सत्तापक्ष नेते, मा.विरोधी पक्ष नेते आणि बहुजन समाज पक्षाच्या गटनेत्याने बंद लखोटे मा. महापौरजी यांच्याकडे सादर केले.)

मा. महापौरजी यांना सादर करण्यात आलेला लखोटा सभागृहामध्ये उघडून त्यातील नावे वाचून दाखविण्याचे मा.महापौरजी यांनी निगम सचिवांना निर्देश दिले.

निगम सचिवः— मा.महापौरजी, बहुजन समाज पक्षाच्या गटनेता सौ.वैशाली अविनाश नारनवरे तर्फे दुर्बल घटक समितीच्या 1 (एक.) सदस्याचे नामनिर्देशन करण्यांत आले आहे ते मी वाचून दाखविते.

| अनु क. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | सौ.वैशाली अविनाश नारनवरे( .प्रभाग क. 6 क) |

निगम सचिव :— मा.महापौरजी, मा. महापौरजी, भारतीय जनता पक्षातर्फे दुर्बल घटक समितीच्या 8 (आठ) सदस्याचे नामनिर्देशन करण्यांत आले आहे ते मी वाचून दाखविते.

| अनु क. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | सौ. कांता लारोकर |
| 2. | श्री. विजय चुटेले |
| 3. | सौ. शिल्पा धोटे |
| 4. | सौ.शकुंतला पारवे |
| 5. | सौ.लिला हाथीबेड |
| 6. | सौ. विद्या मडावी |
| 7. | सौ. उषा पॅलेट |
| 8. | श्री. लहुकुमार बेहते |

निगम सचिवः— मा. महापौरजी, मा. महापौरजी, भारतीय राष्ट्रीय पक्षातर्फे दुर्बल घटक समितीच्या 2 (दोन) सदस्याचे नामनिर्देशन करण्यांत आले आहे ते मी वाचून दाखविते.

| अनु क. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री.परसराम काशिनाथ मानवटकर प्रभाग— 7 अ |
| 2. | आशा नेहरु (आयेशा) प्रभाग — 8 अ |

अशा रितीने महानगरपालिकेतील मागासवर्गीयांसाठी कल्याणकारी योजना वरिल खर्च योग्य प्रकारे होते किंवा नाही याकडे लक्ष वेधन्यासाठी नगरसेवकापैकी जे नगरसेवक मागासवर्गीयांतील असतील अश्या 11 सदस्यीय त्यात भारतीय जनता पक्षाचे 8 सदस्य, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे 2 सदस्य व बहुजन समाज पक्षातील 1 सदस्य राहतील अशी दुर्बल घटक समिती सन 2021—2022 करिता गठीत करण्याचा प्रश्न विचारात घेवून सभागृहात घोषित केलेल्या सदस्यांना दुर्बल घटक समिती सदस्य म्हणून मान्यता प्रदान करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

| अनु क. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|

| | |
|---|---|
| १. | सौ. कांता लारोकर **अध्यक्ष** |
| २. | सौ.वैशाली अविनाश नारनवरे(.प्रभाग क. 6 क) |
| 3. | श्री. विजय चुटेले |
| 4. | सौ. शिल्पा धोटे |
| 5. | सौ.शकुंतला पारवे |
| 6. | सौ.लिला हाथीबेड |
| 7. | सौ. विद्या मडावी |
| 8. | सौ. उषा पॅलेट |
| 9. | श्री. लहुकुमार बेहते |
| 10. | श्री.परसराम काशिनाथ मानवटकर प्रभाग– 7 अ |
| 11. | आशा नेहरु (आयेशा) प्रभाग – 8 अ |

ॲड धर्मपाल मेश्राम:- पाईंट ऑफ इन्फोमेशन, या विषयात दुर्बल घटक समितीकरिता नावे दिलेली आहेत. त्या संदर्भात नेमके काय अधिकार या समितीच्या अध्यक्षांना आहेत आणि जर ते आहेत तर प्रशासनाने काही वेगळया समित्या अवांतर तयार केलेल्या आहेत. या विषयात असो किंवा कुठल्याही विषयात असो, प्रशासनाने अनेक समित्या केल्या आहे. मी आपल्याला विनंती करतो प्रशासनाने त्या संदर्भात माहिती दयावी की वेगळया कुठल्या समिती तयार केलेल्या आहेत. तसे अधिकारी एमएमसी ॲक्ट अधिनियमा अंतर्गत आहेत काय ? ते मग आयुक्त असतील, अति.आयुक्त असतील यांना असे काही अधिकार आहेत काय? याची माहिती मला हवी आहे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

निगम सचिव(श्रीमती लाडे):- मा.महापौरजी, विशेष समिती रचना आहे. त्या अंतर्गत अधिनियम कलम ३० अन्वये......

ॲड धर्मपाल मेश्राम:- पाईंट ऑफ आर्डर, माझा प्रश्न स्पेसिफिक आहे. या संदर्भाने मी प्रश्न देखील विचारलेला आहे. मा.आयुक्त साहेबांनी विविध विभागाच्या कार्यसंचालनाकरिता जवळपास १८ समिती केल्या आहेत.

महापौर:- सन्माननीय सदस्य पहिले आपला प्रश्न हा होता की या समितीचा अधिकार काय आहे. हे सन्माननीय सचिव सांगत आहे त्यानंतर आपला दुसरा प्रश्न आहे. निगम सचिवांना उत्तर देवू दयावे.

निगम सचिव(श्रीमती लाडे):- मा.महापौरजी, कलम ३० अन्वये आपल्याला स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती, वैद्यकीय सेवा व विशेष आरोग्य समिती, विधी व सामान्य प्रशासन विशेष समिती, शिक्षण विशेष समिती, गलिच्छ वस्ती निर्मुलन व घर बांधणी विशेष समिती, क्रीडा विशेष समिती, महिला व बाल कल्याण विशेष समिती, जलप्रदाय विशेष समिती, कर आकारणी व कर संकलन विशेष समिती, अग्निशमन व विद्युत विशेष समिती उपरोक्त समिती गठीत करण्याचा अधिकार आहे तसेच १ (ब) च्या अंतर्गत त्यांचे अधिकार मेंशन केले आहेत.

महापौर:- सोबत मा.सदस्यांचे असेही म्हणणे आहे प्रशासनाने कामाच्या दृष्टीने या समितीशिवाय प्रशासकीय अधिका-याने वेगळया समिती सुध्दा गठीत केल्या आहेत काय? असा त्यांचा प्रश्न आहे.

ॲड धर्मपाल मेश्राम:- मा.महापोरजी, मा.आयुक्तांनी जवळपास १८ प्रकारच्या प्रशासकीय समित्या निर्माण केल्या आहेत याची काय उपयोगिता आहे. महानगरपालिकेच्या कोणत्या अधिनियमाच्या अधिन राहून आयुक्त साहेबांनी अशा पध्दतीच्या समिती केलेल्या आहेत. त्या अधिनियमाचे वाचन प्रशासनाने याठिकाणी करावे अशी आपल्या माध्यमातून विनंती करतो.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

निगम सचिव(श्रीमती लाडे):- सामान्य प्रशासन उपायुक्त जैन साहेबांनी उत्तर दयावे.

श्री. निर्भय जैन(उपायुक्त) मा.महापौरजी, प्रशासनाने कलम ४४ अंतर्गत समिती गठीत करण्याचा प्रश्न मा.सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. त्या अंतर्गत प्रशासकीय कामाकाजाच्या अनुषंगाने वेळोवेळी मा. आयुक्तांनी समित्या गठीत केल्या आहेत. याची माहिती त्यांना दिलेली आहे. त्या समित्या गठीत करण्याचा प्रशासकीय प्रमुख म्हणून मा.आयुक्तांना अधिकार आहे. त्या अधिकाराच्या अंतर्गत केलेल्या आहेत. कलम ६७ अंतर्गत कार्यकारी अधिकार संपुर्ण आयुक्तांकडे विहित आहेत.

ॲड धर्मपाल मेश्राम:- पाईंट ऑफ आर्डर, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत कुठल्या कलमा अन्वये हा अधिकार आयुक्तांना विहित आहे. याचे स्पष्टीकरण करण्यात यावे अशी मी आपल्या मार्फत नम्र विनंती करीत आहे.

श्री. निर्भय जैन(उपायुक्त) मा.महापौरजी, कलम ६७ अंतर्गत मा. आयुक्तांना अधिकार आहेत.

ॲड धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, कलम ६७ चे वाचन करण्यात यावे.

निगम सचिव(श्रीमती लाडे):- मा.महापौरजी (कलम ६७ चे वाचन केले)

ॲड धर्मपाल मेश्राम:- पाईंट ऑफ आर्डर, मा.महापोरजी, १८ प्रकारच्या समित्या केल्या आहेत अति.आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली. या ज्या कलमाचे वाचन निगम सचिवांनी केले आहे. त्याच्यामध्ये स्पष्ट नमुद आहे. स्थायी समितीच्या मान्यतेने आणि लेखी मंजूरीच्या अधीन राहून अशा प्रदत्त समिती गठीत करण्याचा मा.आयुक्तांना अधिकार आहे काय? नाही आहे तर या उत्तराचे मी काय करु. मा.आयुक्त या उत्तरासाठी सभागृहाला बांधील आहेत किंवा नाही. मा.महापौरजी मी आपल्याला विनंती करतो याचे स्पष्टीकरण मा. आयुक्तांनी दिले पाहिजे. आपल्या माध्यमातून मी विनंती करतो आपण तसे मा. आयुक्तांना निर्देश दयावे.

महापौर:- आयुक्त महोदयांनी निवेदन करावे.

निगम आयुक्त:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. आता याच्यामध्ये आपल्याला महानगरपालिका चालविण्याकरिता, प्रशासन चालविण्याकरिता प्रत्येक प्रशासकीय दृष्टीकोनातून समिती गठीत करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे कायद्याच्या याच सेक्शनप्रमाणे, कायद्याच्या चौकटीत राहून याच पध्दतीने करायला पाहिजे असे नाही. ज्या वेळेस सेक्शन वापरुन त्याचा उल्लेख केला असेल त्याचे पालन केले आहे. ज्या वेळेस उदाहरणार्थ सॉलीड वेस्ट मॅनेजमेंट रुल दिला आहे. कायद्या फक्त एमएमसी ॲक्ट नाही. भरपूर प्रमाणात अर्बन कायदयाची अंमलबजावणी करीत आहे. तसे करीत असतांना प्रत्येक ठिकाणी प्रशासकीय दृष्टीने, प्रशासकीय काम सुरळीत होण्याच्या दृष्टीने वेगवेगळया समिती प्रशासन डेली प्रत्येक ठिकाणी वेगवेगळया ठिकाणी करतो. मुद्दा एवढाच आहे की या ठिकाणी ज्यावेळेस प्रशासकीय बाबीने तयार करण्यात आलेली समिती आणि दुसरीकडे कायद्याने तयार करण्यात आलेली समिती यामध्ये विसंगती निर्माण होता कामा नये. तसे झाले तर कायद्याने तयार झालेल्या समिती त्याचे जे लॉजीकल कन्क्ल्युजन आहे त्याला अनुसरुन काम करणे अपेक्षित आहे. आपल्याला याच्यामध्ये समन्वय करण्याच्या दृष्टीने बघणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रशासकीय कमेटी मला मा.सदस्यांना विनंती आहे ते ॲडव्होकेट आहेत त्यांनी सांगावे कोणत्या सेक्शनप्रमाणे आयुक्तांनी कुठली कमेटी करु नये असा काही उल्लेख आहे काय? प्रशासनाच्या प्रत्येक कमेटीमध्ये आक्षेप करण्यापेक्षा प्रशासकीय कामकाज कसे सुरळीत होईल. तशा तशा पध्दतीने प्रत्येक आयुक्त करीत आहेत. त्यांच्या कामकाजामध्ये काही त्रुटया असतील तर नक्कीच सांगायला पाहिजे परंतु कमेटी कां केली आहे याच्यामध्ये......

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, आमची कोणतीही भुमिका त्यांच्या कामामध्ये ढवळाढवळ करण्याची नाही. परंतु लोकाभिमुख काम करीत असतांना प्रशासन आणि सर्वोच्च सभागृह आणि स्थायी समिती यांच्या अधिकारावर घाला घालण्यात येते अशी आम्हांला शंका आहे. आणि विकास कामे सुरु करण्यासाठी उपायुक्त यांची समिती

कोणत्या अधिकारानुसार आहे आणि कोणत्या कायद्यानुसार आहे. माझ्याकडे पत्र आहे. स्थायी समिती अध्यक्षांनी मा.आयुक्तांना दिलेले पत्र आहे. त्या पत्रात उल्लेख केलेल्या कलमांना मी वाचले. त्यात कोणत्याही पध्दतीने अधिकार प्रशासनाला दिलेला नाही आहे. तरीही ती कमेटी मान्य केली. त्यांच्या कामामध्ये आम्हांला ढवळाढवळ करावयाची नाही. मा.महापौरजी, आपल्या ऐवजदाराच्या विषयामध्ये एक कमेटी केली आहे. राज्य सरकारने नियम तयार केले आहे. नियम तयार करीत असतांना या सभागृहानेही काही निर्णय घेतले आहे ते थांबविण्याचे अधिकार त्या समितीला आहेत काय? या समितीवर आमचा आक्षेप आहे. एक वेळेस चुक राहू शकते तशी भावना आमची नाही. मा. धर्मपाल मेश्राम यांचे असे म्हणणे नाही की आयुक्तांनी कमेटी तयार करु नये. त्यांना जेवढया वाटतात तेवढया समित्या कराव्यात परंतु त्या लोकोभिमुख असाव्यात. त्यामध्ये सर्वोच्च सभागृह किंवा आर्थिक बाबतीत निर्णय घेणारी स्थायी समिती यांच्या अधिकारावर अडचण निर्माण करीत आहे काय? ही भुमिका सुध्दा समजून घ्यावी. समन्वय, समन्वय आणि समन्वय हा दोन्ही कडून असावा. एकाकडून असण्यासाठी कुणी ठेका घेतलेला नाही. दुस-यानेही त्याचे पालन करावे आम्ही सर्व मदत करण्यात तयार आहोत. हे सभागृह आणि ही महानगरपालिका कायद्यानुसार चालली पाहिजे असेही आमचे मत आहे. आम्ही कायद्याच्या बाहेर कुठलेही काम करणार नाही. लोकप्रतिनिधी जनतेतून निवडून आलेले आहेत आणि एमएमसी ॲक्टनुसार जे अधिकार दिलेले आहेत त्यांची निश्चित आम्ही पालन करु. प्रशासन करीत नसेल तर त्यांना वेळोवेळी आठवण या सभागृहाच्या माध्यमातून आणि मा.महापौरांच्या माध्यमातून करुन देण्याची जबाबदारी आमची आहे. आमच्या जनप्रतिनिधींना लोकांनी निवडून दिले आहे. आम्हांला आयुक्तांच्या अधिकारावर घाला घालावयाचा नाही. परंतु अशा समिती तयार करुन नागरिकांना मिळणा-या सुखसोयीवर अडचण निर्माण करीत असेल तर माझी आपल्याला विनंती आहे. आपण सातवा वेतन आयोग लावला त्यात ज्या अटीशर्ती दिलेल्या आहेत त्या अटीशर्तीचे पालन करण्याकरिता कुठली समिती आहे काय? सेवन्थ पे लागण्यापूर्वी जे रिटायर्ड झाले त्यांना सेवन्थ पे लागला पाहिजे या करिता कुठली समिती आहे काय? ऐवजदार कर्मचारी जे परमानंट झाले यांना सेवन्थ पे लागला पाहिजे याकरिता कुठली समिती आहे काय? त्याकरिता समिती नाही, शासनाने दिलेल्या अटीशर्तीचे पालन करण्याकरिता समिती नाही परंतु विकास कामांमध्ये समिती, ऐवजदारामध्ये समिती यामुळे समन्वय निर्माण होत नाही. आमचा आयुक्तांवर विश्वास आहे परंतु अशा समिती निर्माण करुन लोकप्रतिनिधी, सभागृह, स्थायी समितीवर यांचा विश्वास आहे किंवा नाही असा प्रश्न निर्माण होतो. समन्वय तुम्हांला घडवून आणायचा आहे. मा.महापौरजी यांनी आदेश दिले होते की विकास कामाच्या फाईली दहा दिवसाच्या आंत करावे. आमचा तुमच्यावर विश्वास आहे परंतु याचा जर कुणी गैरफायदा घेणार असेल तर आम्ही एमएमसी ॲक्टची आठवण करुन देवू. लोकप्रतिनिधी याप्रमाणे चालतील, प्रशासन याप्रमाणे चालले पाहिजे त्यामुळे आपल्या माध्यमातून विनंती आहे. समन्वय दोन्ही बाजूने झाला पाहिजे. मा.महापौर आणि आयुक्तांनी सोबत बसुन समित्या तयार कराव्यात, काय धोरण असले पाहिजे याच्यावर एकत्रित निर्णय घेतला पाहिजे. सर्वोच्च सभागृहाच्या निर्णयावर, स्थायी समितीच्या निर्णयावर काही आक्षेप असतील तर ते आम्ही ऐकुन घेवू. परंतु कुणी १८ समित्या अशा पध्दतीने तयार करीत असेल तर ही भुमिका योग्य नाही. याबाबत मा.महापौरजी आपण योग्य निर्णय घ्यावा.

ॲड धर्मपाल मेश्राम:- मा. महापौरजी, माझी एकच विनंती आहे. या समित्या तत्कालीन प्रभावाने बरखास्त कराव्यात. त्यांना आवश्यक वाटेल त्या आवश्यक समिती तयार करण्यासाठी सभागृहाची परवानगी घ्यावी. या सर्व प्रशासकीय समित्या तत्कालीन प्रभावाने बरखास्त कराव्यात अशी माझी विनंती आहे.

महापौर:- सभागृहात या विषयावर चर्चा झाली. मागील १२-१५ महिन्यापासून महानगरपालिकेमध्ये जे वातावरण आहे त्या वातावरणामध्ये एकमेकांबद्दलचा जो विश्वास होता तो कमी झालेला दिसत आहे. त्याची पुर्ण बाब या मा.सदस्यांच्या वक्तव्यामध्ये लक्षात येत आहे. निर्वाचित लोकप्रतिनिधी आणि प्रशासन या दोघांनी संगनमत करुन प्रशासन चालवावे ही

लोकतंत्राची खुबसुरती आहे. पण मागील काही दिवसात या संबंधात खटास निर्माण झाल्यामुळे हे वातावरण दुषित झालेले आहे. मा.आयुक्तांनी प्रशासनाच्या दृष्टीने समिती कराव्यात याचात नगरसेवकांचा काही गैरसमज नाही परंतु हे करीत असतांना हे एकमेकांशी बोलून केल्या तर गैरसमज दूर होतो. प्रत्येक विषय नियमावर बोट ठेवून होत नाही. प्रशासन त्या दिशेने वागत असेल तर जनप्रतिनिधींना त्या दिशेने वागणे नितांत आवश्यक आहे म्हणून हा विषय चर्चेला आला. आयुक्तांनी आपले निवेदन सादर करीत असतांना चांगली भुमिका मांडली की आमच्या कमेटीने घेतलेला कोणताही निर्णय जर स्टॅच्युटरी कमेटीने घेतलेल्या निर्णयाच्या विरुध्द असेल तर आम्ही स्टॅच्युटरी कमेटीचा निर्णय मान्य करु. त्यांनी आपली भुमिका स्पष्ट केली. त्यांच्या भुमिकेचे स्वागत आहे त्याकरिता मी आयुक्तांचे सुध्दा अभिनंदन करतो. मी असे निर्देश सभागृहाच्या माध्यमातून देतो. कोणत्याही प्रकारचा गैरसमज प्रशासनाने न करता हया सर्व समित्या मा.आयुक्तांनी ज्या तयार केल्या. मा.आयुक्तांनी त्या मागची भुमिका आवश्यक नाही ती सर्व सभागृहाच्या पटलावर आणली पाहिजे. आपण महानगरपालिकेचे जे मुख्य पदाधिकारी आहेत. महापौर आहेत, उपमहापौर आहेत, स्थायी समिती अध्यक्ष आहेत, सत्तापक्ष नेते आहेत, विरोधी पक्ष नेते आहेत, बसपा पक्ष नेते आहेत यांच्या सोबत बसुन फक्त आयुक्तांसोबत बसुन चर्चा करावी जी आवश्यक समिती आहे, कामकाजासाठी जी आवश्यक वाटत ते समिती ठेवून बाकीचे पुर्ण रुपाने त्याचे विसर्जन आयुक्त स्वंय करतील याप्रकारचे निर्देश देतो. आयुक्तांचा मानस आयुक्तांनी व्यक्त केला आहे की स्टॅच्युटरी कमेटीचा निर्णय याला बाधित होणार नाही याची हमी आयुक्तांनी दिलेली आहे. म्हणून यादृष्टीने हे सभागृह निर्णय घेत आहे. या पाच पदाधिका-यासोबत बसुन ज्या समिती तयार केली आहे त्यावर निर्णय घ्यावा. या विषयावर सध्या चर्चा केली. या चर्चेच्या अनुषंगाने जे मी निर्देश दिले त्यांच्यात आयुक्तांच्या एक म्हणणे आहे. ते म्हणणे याच्यात स्विकृत करुन हे निर्देश देण्यात येत आहे.

श्री.प्रविण दटके:- मा. महापौरजी, एक उत्तम विषय स्थावर विभागातर्फे आलेला आहे त्याकरिता स्थावर विभागाचे अभिनंदन करतो. मी आपलेही अभिनंदन करतो. आपण पत्रकार परिषदमध्ये विषय आणला होता. आयुक्तांनी आणि मा.महापौरांनी या दोघांनी मिळून एक चांगला विषय सभागृहात आणला. कोव्हीड काळात काय झाले ते आपल्याला माहीत आहे. राधाकृष्णन बी. आयुक्त म्हणून या नागपूर महानगरपालिकेत आहे आणि त्यांनी तातडीने निर्णय घेवून खाजगी दवाखान्यात काही सोयीसुविधा पुरविण्याचा प्रयत्न केला. या सभागृहाच्या तर्फे ती त्यांचे अभिनदंन करतो. एक चांगला विषय, देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्ष पुर्ण होत आहे आणि नागपूर ७५ दवाखाने आणि तेही विशेषत- स्लम भागात, या ७५ वर्षी स्वातंत्र्याला होत असतांना ज्यांनी सर्वोच्च कामगिरी केली अशा स्वातंत्र्य सैनिकांच्या नावावर दवाखाने बांधणे ही भावना अभिनंदन करणारी बाब आहे. या दवाखान्याच्या माध्यमातून विशेषत- आऊटर भागातील जनतेकरिता सोयी सवलतीची आवश्यकता होती ते पहिले महानगरपालिकेचा चालता फिरता दवाखाना देत होते. त्या चालताफिरता दवाखाना आणि या ७५ दवाखान्याच्या माध्यमातून एक दवाखाना स्वंयसेवी संस्थेच्या माध्यमातून एकीकडे प्रशासन, स्वंयसेवी संस्था आणि लोकप्रतिनिधी यांच्या सर्वांच्या माध्यमातून एक विश्वास जनतेत निर्माण होवून कोणत्याही पक्षाचे राजकारण न करता सर्वांना याच्यात समावून घेवून एक चांगला विषय स्लमच्या जनतेकरिता, गोरगरीबांकरिता, आऊटर भागातील जनतेकरिता आणला आहे एक चांगली सुविधा नागपूर शहरात ७५ ठिकाणी सुरु होईल. ऑलरेडी नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून ६५ ठिकाणी सुरु आहे. अजून उत्तम हेल्थपोस्ट आणि डिसेंट्रलाईज करुन त्या त्या भागात या हेल्थपोस्टला सुरुवात करीत आहे. नागपूर शहरात आपण स्वंयसेवी संस्थेच्या माध्यमातून करीत आहे. त्याकरिता मी या नागपूर नगरीचे महापौरजी आपले अभिनंदन करतो आणि त्याचप्रमाणे प्रशासनाचे प्रमुख म्हणून मा. आयुक्त यांना धन्यवाद देतो की त्यांनी. या शहरातील गोरगरीबांची काळजी करुन हा प्रस्ताव लगेचच महासभेच्या पटलावर ठेवला. या सभागृहाने या प्रस्तावाला एकमताने मान्यता देवून सर्व लोकप्रतिनिधींनी या विषयावर तातडीने लक्ष देवून आणि जेथे याची गरज आहे त्या ठिकाणी दवाखाना साध्य होवून यात प्रशासनाची जी भुमिका आहे त्या भुमिकेच्या माध्यमातून आपण याचा निर्णय घ्यावा. कुठल्या

संस्थेला किती दयावा. त्याचा निर्णय प्रशासन आणि महापौर आणि पदाधिकारी यांच्या स्तरावर आपण घ्यावा आणि परत एकदा गोरगरीब जनतेच्या माध्यमातून, गरजू लोकांच्या माध्यमातून, स्लम आणि आऊटर भागातील जनतेच्या माध्यमातून मा.महापौरजी, मा.आयुक्त आणि संबंधित प्रशासकीय अधिकारी, स्थावर विभाग, हेल्थ विभाग यांचे अभिनंदन करतो आणि सभागृहाला विनंती करतो की एकमताने हा प्रस्ताव मंजूर करावा.

महापौर:- मी स्वत- महानगरपालिकेच्या माध्यमातून, महानगरपालिकेचे प्रशासन आणि पदाधिकारी एकत्रितपणे काम करते. कितीही मोठा विषय असला की तो लवकरात लवकर होवू शकते याची संमत्ती या प्रस्तावामध्ये येत आहे. विशेष बाब म्हणजे २०२० हे वर्ष सर्वात जास्त महानगरपालिकेत चर्चेला होता आणि संयोग बघा विषय क्रमांक २० वर ती संपुर्ण चर्चा संपुष्टात आलेली आहे. २०२०चे उत्तर विषय क्र. २० ने दिलेले आहे. प्रशासन आणि पदाधिकारी सोबत मिळून राहिले तर या शहरासाठी चांगले काम होवू शकते हे एक उत्तम उदाहरण आहे.

**ठराव क्र.५०/ वि.क्र.२०** :- दि.१४/०१/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजताच्या बैठकीत मा. महापौर
**{स्थावर विभाग}** महोदयांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे नागपूर महानगरपालिका सीमेत ७५ वंदे मातरम नागरी आरोग्य सुविधा केंद्र निर्माण करून नागरीकांना आरोग्य सेवा देणे प्रस्तूत आहे.

कोरोना वैश्विक महामारीत नागरीकांना आरोग्य सेवा प्रदान करतांना प्राप्त अनुभवातून असे निदर्शनास येते की, नागपूर महानगरपालिका सीमेत पुरेसे नागरी आरोग्य सुविधा केंद्र निर्माण करणे गरजेचे आहे. नागपूर महानगरपालिका सीमेतील प्रत्येक नागरीकांना वेळेत प्राथमिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे ही नागपूर महानगरपालिकेच्या आवश्यक कर्तव्यांपैकी एक कर्तव्य आहे. सध्यास्थितीत नागपूर महानगरपालिकेद्वारा खालील माध्यमातून नागरीकांना आरोग्य सेवा देण्यात येत आहे.

| अ.क्र. | दवाखाने | एकूण |
|---|---|---|
| १ | आंतररूग्ण दवाखाने | ४ |
| २ | रोगनिदान केंद्रे | २ |
| ३ | हेल्थपोस्ट | ६ |
| ४ | ॲलोपॅथीक दवाखाने | ७ |
| ५ | आयुर्वेदीक दवाखाने | १० |
| ६ | होमीयोपॅथी दवाखाने | ३ |
| ७ | युनानी दवाखाने | ३ |
| ८ | प्राकृतिक चिकित्सा केंद्र | १ |
| ९ | पंचकर्म चिकित्सा केंद्र | १ |
| १० | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र | २८ |
| **एकूण** | | **६५** |

परंतू कोरोना सारख्या सांसर्गिक किंवा संक्रामक रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रत्येक नागरीकांना वेळेत प्राथमीक आरोग्य सुविधा प्राप्त होणेसाठी नागपूर महानगरपालिका सीमेत ७५ वंदे मातरम नागरी आरोग्य सुविधा केंद्र निर्माण करून इच्छूक स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने नागपूर महानगरपालिका द्वारा नागरीकांना सेवा देणेचा संकल्प आहे.

**<u>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी</u>**

- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (महा.१९४९ चा ५९) चे प्रकरण सहा चे कलम ६३ पोटकलम ६ च्या तरतुदी अन्वये सांसर्गिक किंवा संक्रामक रोगाने आजारी असलेल्या किंवा अशा रोगाची बाधा झाल्याची शंका असलेल्या व्यक्तीना वेगळे ठेवण्यासाठी व उपचार करण्यासाठी असलेल्या रूग्नालयासहीत सार्वजनिक रूग्नालये व दवाखाने बांधणारे किंवा संपादन करणे व ती सुस्थितीत ठेवणे आणि सार्वजनिक वैद्यकीय साहाय्यासाठी आवश्यक असतील अशा अन्य उपाययोजना करणे हे नागपूर महानगरपालिकेची आवश्यक कर्तव्यांपैकी एक कर्तव्य आहे.

- तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (महा.१९४९ चा ५९) चे प्रकरण सहा चे कलम ६६ पोटकलम ४२ च्या तरतुदी अन्वये नागपूर महानगरपालिका सीमेतील नागरीकांचे आरोग्य संवर्धन होण्याचे दृष्टीने उपाययोजना करणे हे नागपूर महानगरपालिकेचे स्वेच्छाधीन कर्तव्यातील एक कर्तव्य आहे.

**नागपूर महानगरपालिका आवश्यक व स्वेच्छाधीन कर्तव्या अंतर्गत उपाययोजना करीत आहे.**

**१.संक्षिप्त नांव व व्याप्ती** :- १) ह्या उपाययोजनेस "वंदे मातरम नागरी आरोग्य सुविधा केंद्र निर्माण करून नागपूर महानगरपालिका सीमेतील प्रत्येक नागरीकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करणे" असे म्हणावे.

भारत देश स्वतंत्र होवून ७५ वर्ष झालेले असल्याने स्वांतत्र्य दिनाची ७५ वी वर्षगाठ निमीत्ताने या उपाययोजनेंतर्गत निर्माण होणाऱ्या ७५ वंदे मातरम नागरी आरोग्य सुविधा केंद्रांना परमविर चक्र/शौर्य पदक धारक वीर जवानांचे नांव देवून त्यांची वीरगाथासंबंधी संपूर्ण माहिती संबंधीत आरोग्य केंद्राच्या अग्रभागी प्रदर्शीत करणे.

२) या उपाययोजनेंतर्गत नागपूर महानगरपालिका सीमेतील ज्या परिसरात नागपूर महानगरपालिकेचे शहरी आरोग्य केंद्र किंवा शासनाचे आरोग्य केंद्र नाही अशा परिसरात "वंदे मातरम नागरी आरोग्य सुविधा केंद्र" निर्माण करून स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने नागरीकांना प्राथमिक आरोग्य सुविधा उपलब्ध करणे.

**२.उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधा :-**

- <u>**स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून**</u>
  - ➢ वैद्यकीय अभ्यासक्रमाची पदवी प्राप्त वैद्यकीय अधिकारी कडून रूग्नांची मोफत तपासणी करणे.
  - ➢ रूग्नांच्या आजारानुसार रूग्नास आवश्यक मोफत औषधी उपलब्ध करणे.

**३.वंदेमातरम नागरी आरोग्य सुविधा केंद्रातील मनुष्यबळ** :-

- वैद्यकीय अधिकारी
- सहाय्यक/कंपाऊंडर/फार्मासिस्ट ऑफीसर
- शिपाई
- सफाई कर्मचारी

**४.वंदे मातरम नागरी आरोग्य सुविधा केंद्र नागरीकांस उपलब्ध असणेची वेळ** :-

- सकाळी ८.३० ते ११.३०
- सायंकाळी ७.३० ते ९.३०

**५.नागपूर महानगरपालिका व स्वयंसेवी संस्थेसोबत होणारा सामंजस्य करार** :-

- **नागपूर महानगरपालिकेची जबाबदारी**

➢ नागपूर महानगरपालिकाद्वारा आवश्यक Infrastructure जसे की, स्थायी इमारत/Portable Cabin Structure.

➢ विद्युत, पाणी, साफ सफाई व्यवस्था

➢ सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे

➢ वंदे मातरम नागरी आरोग्य सुविधा केंद्रात Generate होणारे Biomedical Waste म.न.पा. द्वारे नियुक्त एजेन्सीद्वारा गोळा करून विल्हेवाट लावण्यात येईल.

➢ नागपूर महानगरपालिकेद्वारा कोणतेही आर्थिक सहाय्य इच्छूक स्वयंसेवी संस्थेला दिल्या जाणार नाही.

➢ प्राथमिक सेवेच्या ऐवजी इच्छूक संस्था विस्तारीत सेवा देणेस इच्छूक असल्यास आकारणारे शुल्क महानगरपालिका निश्चित करेल.

➢ वैद्यकीय सेवेचे Audit करणाऱ्या त्रयस्थ संस्थेकडून "वंदे मातरम नागरी आरोग्य सुविधा केंद्र" द्वारे पुरविण्यात येणाऱ्या सेवेचे मासीक Audit करण्यात येईल.

➢ वंदे मातरम नागरी आरोग्य सुविधा केंद्राद्वारे स्वंयसेवी संस्थेद्वारा देण्यात येणाऱ्या वैद्यकीय सेवेच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्याकरीता उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, आरोग्य अधिकारी (वैद्यकीय), म.न.पा. व इतर

वैद्यकीय क्षेत्रातील दोन तज्ञ यांना नियुक्त करण्यात येईल व वेळोवेळी ते या वैद्यकीय सेवेबाबत अहवाल मा. आयुक्तांना देवून अशा तऱ्हेच्या संस्थांच्या सेवा पुढे सुरू ठेवायच्या किंवा नाही याबाबत मा. आयुक्त निर्णय घेतील.

- एकाच ठिकाणच्या वंदे मातरम नागरी आरोग्य सुविधा केंद्रास एका पेक्षा जास्त संस्थेनी इच्छूकता दर्शविल्यास, संबंधीत संस्थेचा सेवा कार्यातील अनुभव, वैद्यकीय सेवा पुरविणेबाबत गुणवत्तापूर्वक मनुष्यबळ, आर्थिक क्षमता इत्यादी निकषाच्या आधारे संस्थेची निवड करणेचा अधिकार मा. आयुक्त, म.न.पा.स राहील.

- **स्वयंसेवी संस्थेची जबाबदारी**
  - इच्छूक स्वयंसेवी संस्था द्वारा वैद्यकीय पदवीधारक डॉक्टर, सहाय्यक, चपराशी ची नियुक्ती करेल.
  - इच्छूक स्वयंसेवी संस्था रूग्णांकडून रू.१०/- नोंदणी शुल्क आकारून तपासणी व आजारानुसार आवश्यक मोफत औषधीची व्यवस्था करेल.
  - इच्छूक स्वयंसेवी संस्था उक्त सेवा कमीत कमी तीन वर्ष नागपूर महानगरपालिका सीमेतील नागरीकांना उपलब्ध करून देईल.
  - इच्छूक स्वयंसेवी संस्था नागपूर महानगरपालिकेचे ब्रिदवाक्य पौर जन हिताय च्या प्रेरणेतून नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक नागरीकांना प्राथमिक आरोग्य सेवा देईल.
  - संबंधीत इच्छूक स्वयंसेवी संस्थेस तीन वर्षाचा कालावधी संपूष्टात येणेपूर्वी स्वीकारलेल्या जबाबदारीतून मुक्त व्हावयाचे असल्यास तीन महिन्यापूर्वी अग्रीम अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.
  - वैद्यकीय सेवेसंबंधी राष्ट्रीय योजना राबविणे इच्छूक संस्थेस बंधनकारक राहील.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करून नागपूर महानगरपालिका क्षेत्रात ७५ वंदे मातरम नागरी आरोग्य सुविधा केंद्र उभारून स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने नागरीकांना प्राथमिक सेवा देणेबाबत प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मा.सदस्य श्री. सुनिल अग्रवाल यांच्या सुचनेनुसार प्रस्तावित जागेत वेळोवेळी बदल करावयाचा झाल्यास त्याचे अधिकार मा.महापौरजी यांना प्रदान करण्याच्या सूचनेसह हा विषय मंजूर करण्यांत येते या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.५१/ वि.क्र.२१</u> :-** महाराष्ट् महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२८ अन्वये **{कर व कर आकारणी विभाग}** मालमत्ता करामध्ये समाविष्ट असलेले कर पुढील आर्थीक वर्षात महानगरपालिकेव्दारे कर ज्या दरानी बसविण्यात येतील तसेच पुढील सरकारी वर्षात ज्या दरानी व ज्या मर्यादेपर्यंत बसविण्यात येतील ते दर व ती मर्यादा याबाबत महानगरपालिकेने स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेवून फेब्रुवारी महिन्याच्या वीस तारखेला किंवा त्यापुर्वी महाराष्ट् महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ च्या तरतूदी अन्वये निश्चीत करणे आवश्यक आहे. त्या अनूषंगाने स्थायी समितीनी ठराव क्र. ६४ दिनांक ०२/०२/२०२१ अन्त्रये विचारात घेवून मागील आर्थीक वर्षातील दरामध्ये कोणतीही वाढ न करता एकमताने मंजुरी प्रदान केली. करीता सन २०२१-२०२२ हया आर्थीक वर्षामध्ये मालमत्ता करांतर्गत आकारावयाचे विविध कर व त्यांचे दरास स्थायी समितीनी ठराव क्र. ६४ दिनांक ०२/०२/२०२१ अन्वये खालील प्रमाणे मान्यता प्रदान केलेला प्रस्ताव महाराष्ट् महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ चे तरतूदीन्त्रये विचारात घेवून मंजुरी प्रदान करणे बाबतचा उचित निर्णय घेणेबाबत.

<u>महाराष्ट् महानगरपालिका अधीनियमानुसार आर्थीक वर्ष २०२१-२२ करीता</u>
<u>मालमत्ता कर खालील दराने आकारण्यात येत आहे.</u>

| अनू क्र. | कराचा प्रकार | सन २०२०-२१ मध्ये प्रचलित दर | |
|---|---|---|---|
| | | वार्षीक भाडे मुल्य | कराचा दर |
| १ | सामान्य कर | १ ते २००० | १४ टक्के |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २००१ ते ५००० | १८ टक्के |
| | | ५००१ ते २०००० | २२ टक्के |
| | | २०००१ ते ५०००० | २६ टक्के |
| | | ५००१ व त्याचे वर | ३० टक्के |
| २ | मलजल कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १२ टक्के |
| ३ | मलजल लाभ कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १ टक्का |
| ४ | पाणी पट्टी कर | १ ते २००० | १० टक्के |
| | | २००१ ते ५००० | १२ टक्के |
| | | ५००१ व त्याचे वर | १५ टक्के |
| ५ | पाणी लाभ कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १ टक्का |
| ६ | अग्नीशमन कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १ टक्का |
| ७ | दिवाबत्ती कर | लागू नाही | |
| ८ | रस्ते (पथ) कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १ टक्का |
| ९ | महानगरपालिका शिक्षण कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १ टक्का |
| १० | वृक्ष कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १ टक्का |

| या व्यतिरिक्त शहरातील हॉटेल्स, रेस्टॉरेन्ट, मंगल कार्यालये, लॉन्स व हॉस्पीटल्स या मालमत्तांवर खालील दराने वार्षीक विशेष सफाई कर आकारण्यात येत आहे. | | | |
|---|---|---|---|
| ११ | विशेष सफाई कर | वार्षीक भाडे मुल्य ५०००० पावेतो | ७ टक्के |
| | | वार्षीक भाडे मुल्य ५०००१ व त्यापेक्षा जास्त | १० टक्के |

राज्य शासनाचे कर

| अनू क्र. | कराचा प्रकार | सन २०२०-२१ मध्ये प्रचलित दर | |
|---|---|---|---|
| | | वार्षीक भाडे मुल्य | कराचा दर |
| १२ | शिक्षण कर ( नीवासी) | १ ते १५० | २ टक्के |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १५१ ते ३०० | ३ टक्के |
| | | ३०१ ते ३००० | ४ टक्के |
| | | ३००१ ते ६००० | ५ टक्के |
| | | ६००१ व त्याचे वर | ६ टक्के |
| १३ | शिक्षण कर ( अनिवासी) | १ ते १५० | ४ टक्के |
| | | १५१ ते ३०० | ६ टक्के |
| | | ३०१ ते ३००० | ८ टक्के |
| | | ३००१ ते ६००० | १० टक्के |
| | | ६००१ व त्याचे वर | १२ टक्के |
| १४ | रोजगार हमी कर (फक्त अनिवासी) | १ ते १५० | १ टक्का |
| | | १५१ ते ३०० | १.५ टक्के |
| | | ३०१ ते ३००० | २ टक्के |
| | | ३००१ ते ६००० | २.५ टक्के |
| | | ६००१ व त्याचे वर | ३ टक्के |
| ४ | मोठया निवासी इमारतीवरील कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १० टक्के |

उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.५२ /वि.क्र.२२ :-** **(सचिवालय)** म.न.पा. ठराव क्र. 72 दिनांक 20.07.2017 अन्वये मा. महापौरजी यांनी दि. 18.01.2021 रोजी गठीत नामकरण समितीच्या दिनांक 27.01.2021 रोजी भरलेल्या सोबतच्या सभेच्या अहवालामध्ये (परिशिष्ट 'अ') करण्यांत आलेल्या विविध भागाचे नामकरणाच्या शिफारसींना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

## परिशिष्ट 'अ'

नामकरण समितीच्या दि. २७.०१.२०२१ रोजी दुपारी ०१.०० वाजता भरलेल्या सभेचा अहवाल

**उपस्थित सभासद**

| अनु क्र. | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | मा. सौ. मनिषा आशिष धावडे , उपमहापौर | अध्यक्षा |
| २ | मा. श्री. सुनिल जिवराज अग्रवाल | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३ | मा. श्री. दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| ४ | मा. श्री. शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ५ | मा. सौ. चेतना राजु टांक | सदस्या |

अनुपस्थित सभासद

| अनु क्र. | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | मा. श्री. दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| २ | मा. श्री. लहुकूमार दत्तुजी बेहते | सदस्य |

अध्यक्षा :— सभेची कार्यवाही सुरू करण्यात येत आहे आजच्या नामकरण समितीच्या सभेत नामकरण करण्याबाबतचे सहा प्रस्ताव नामकरण समितीसमोर ठेवण्यात येते व हे सहा प्रस्ताव एक मताने मंजुर करण्यात येते.

नामकरण समितीच्या दि. २७.०१.२०२१ रोजीच्या सभेत नामकरण प्रस्तावावर घेण्यात आलेले निर्णय.

| अनु क्र. | सुचविणाऱ्याचे नाव | तपशिल | या पुर्वी नाव दिले असल्यास निर्णय मनपा ठराव | समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. अमर बागडे<br>नगरसेवक प्र. क्र. १३<br>सौ. रूतिका मसराम<br>नगरसेविका प्र. क्र. १३<br>डॉ. सौ. परिणिता फुके<br>नगरसेविका प्र. क्र. १३<br>सौ. वर्षा ठाकरे<br>नगरसेविका प्र. क्र. १३ | प्रभाग क्र. १३ अंतर्गत रामनगर येथील भुखंड क्र. ८१ ते ८८ व २२७ ते २३८ या रस्त्याला ''प. मनोहर न. बर्वे मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत. | --- | मंजूर |
| २ | श्री. निशांत गांधी<br>नगरसेवक<br>श्री. सुनिल हिरनवार<br>नगरसेवक प्र. क्र. १५<br>श्री. संजय बंगाले<br>नगरसेवक प्र. क्र. १५<br>सौ. उज्वला शर्मा<br>नगरसेविका प्र. क्र. १५<br>सौ. रूपा राय<br>नगरसेविका प्र. क्र. १५ | प्रभाग क्र. १५ अंतर्गत बिग बाजाराच्या मागून योगेश्वर अपार्टमेंट मार्गे मोर शाळेजवळ जाणाऱ्या रस्त्याला ''डॉ. लक्ष्मीनारायण सोनी मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत. | --- | मंजूर |
| ३ | श्री. ॲड. धर्मपाल मेश्राम<br>नगरसेवक प्र. क्र. २६<br>श्री. जितेंद्र (बंटी) कुकडे<br>नगरसेवक प्र. क्र. २६<br>सौ. समिता चकोले<br>नगरसेविका प्र. क्र. २६ | प्रभाग क्र. २६ अंतर्गत वाठोडा गाव सालासर विहार ते रिंग रोड या रस्त्याला ''वाठोडा आमला ट्री रोड'' असे नामकरण करण्याबाबत. | --- | मंजूर |
| ४ | श्री. ॲड. धर्मपाल मेश्राम<br>नगरसेवक प्र. क्र. २६<br>श्री. जितेंद्र (बंटी) कुकडे<br>नगरसेवक प्र. क्र. २६<br>सौ. समिता चकोले<br>नगरसेविका प्र. क्र. २६ | प्रभाग क्र. २६ अंतर्गत जयभिम चौक वाठोडा रोड यास''जयभिम चौक'' असे नामकरण करण्याबाबत. | --- | मंजूर |
| ५ | श्री. ॲड. धर्मपाल मेश्राम<br>नगरसेवक प्र. क्र. २६<br>श्री. जितेंद्र (बंटी) कुकडे<br>नगरसेवक प्र. क्र. २६<br>सौ. समिता चकोले<br>नगरसेविका प्र. क्र. २६ | प्रभाग क्र. २६ अंतर्गत संघर्षनगर चौक ते भिमचौक (वाठोडा रोड) या रस्त्यावरील चौकाला ''श्रीराम चौक'' असे नामकरण करण्याबाबत. | --- | मंजूर |
| ६ | श्री. ॲड. धर्मपाल मेश्राम<br>नगरसेवक प्र. क्र. २६ | प्रभाग क्र. २६ अंतर्गत कामाक्षीनगर येथील खुले मैदान, बागेला ''स्व. रामानुज सिंह | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | श्री. जितेंद्र (बंटी) कुकडे<br>नगरसेवक प्र. क्र. २६<br>सौ. समिता चकोले<br>नगरसेविका प्र. क्र. २६<br>सौ. मनिषा कोठे<br>नगरसेविका प्र. क्र. २६ | उर्फ मास्टर साहाब'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजूर |

हस्ता/- मनिषा आशिष धावडे
अध्यक्ष
उपमहापौर
नामकरण समिती, म.न.पा नागपूर

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, या विषयावर काही सुचना आहेत त्या आम्ही लेखी देवून टाकू.

महापौर:-मान्यवर शासनाच्या निर्देशाप्रमाणे निर्धारित समितीच्या शिवाय ज्या काही सुचना आहेत त्या ग्राहय करणे योग्य नाही. याचे काटेकोरपणे पालन झाले पाहिजे असे माझे मत आहे आणि ते आपण स्विकृत करावे असे निवेदन सुध्दा आहे.

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**महापौर**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**